MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक १०/ऑक्टोबर २०२६

संपादकीय

'एल निनो' आणि 'ला निना'

या वर्षी भारताच्या अनेक राज्यांत दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात तर २०० हून जास्त तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले आहेत. सध्या या तालुक्यात सर्वेक्षण सुरू असून, 'ते पूर्ण झाल्यानंतर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई दिली जाईल' असे शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. पावसाची सुरुवात उशिराने झाली, एखाद्या ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी झाले तर दोष दिला जातो तो 'एल निनो'ला. त्यामुळे एल निनो काय आहे? त्याचा पृथ्वीच्या वातावरणावर कसा प्रभाव पडतो? तो कमी करायचा असेल तर काय करण्याची गरज आहे? असे प्रश्न सामान्य माणसाला पडतात. त्यांची उत्तरे माहीत करणे अत्यावश्यक आहे.

आपल्या परिसरात पडणारा पाऊस अनेक बाबींवर अवलंबून असतो. त्यातला एक महत्त्वाचा घटक म्हणजे समुद्रावरील वातावरण. आपल्या पृथ्वीवर पाच महासागर आहेत. यातील हिंद महासागर आपल्या देशाला लागूनच आहे. याखेरीज काही अंतरावर अटलांटिक आणि पॅसिफिक असे दोन महासागर आहेत. या महासागरांतील हालचाली अत्यंत महत्त्वाच्या आहेत. व्यापारी वारे साधारणपणे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. कधी कधी हे वारे दिशा बदलतात. त्यामुळे भारतीय भूप्रदेशावर ढग घेऊन येणारे वारे हे ठरलेल्या वेळापत्रकानुसार येत नाहीत. अशा वेळी पाऊस उशिरा सुरू होतो. पावसाचा कालावधी कमी झाल्याने पडणाऱ्या पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे दुष्काळ पडतो. हा एल निनोचा प्रभाव आहे असे हवामानशास्त्रज्ञ सांगतात. त्याचबरोबर एल निनो सक्रीय झाला तर परिसराचे तापमान वाढते. एका ठरावीक तापमानावर राहण्याची आपल्याला सवय असते. आजूबाजूचे तापमान वाढले तर ते आपल्याला असह्य होते. तापमान जर चांगलेच वाढले तर लोक उष्माघाताने मरतात. हे झाले आपल्या परिसरात होणाऱ्या बदलाचे परिणाम. जागतिक स्तरावर तापमान वाढले तर अनेक अनिष्ट परिणाम संभवतात. पृथ्वीच्या दक्षिण आणि उत्तर ध्रुवावर खूप मोठ्या प्रमाणावर बर्फ साठलेला असतो. पृथ्वीचे तापमान वाढल्याने हा बर्फ वितळतो. त्याचा परिणाम समुद्राची पाण्याची पातळी वाढण्यावर होतो. समुद्रातील काही बेटे समुद्रसपाटीपासून काही फूट उंचीवर आहेत. ही बेटे पाण्यात बुडण्याची शक्यता असते. समुद्रकिनाऱ्यावर अनेक देशांत मोठमोठी शहरे वसलेली आहेत. या शहराचा काही भाग पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. म्हणूनच पृथ्वीचे सरासरी तापमान फार वाढणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

'एल निनो' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा शब्द आहे 'ला निना'. जेव्हा व्यापारी वारे अधिक तीव्रतेने वाहतात तेव्हा हा परिणाम जाणवतो. या परिणामामुळे एल निनोच्या विरुद्ध परिस्थिती निर्माण होते. ला निनो सक्रीय झाला तर खूप पाऊस पडतो. त्यामुळे ओला दुष्काळ निर्माण होतो. एकंदरीत सांगायचे तर, एल निनो आणि ला निना दोन्हीही शेतीसाठी वाईटच. विशेष हे की, एल निनो (El Nino) आणि ला निना (La Ninaa) हे दोन्हीही स्पॅनिश भाषेतील शब्द आहेत. याचा अर्थ 'बालक आणि बालिका' असा होतो. बोलिविया देशातील शेतकऱ्यांना पॅसिफिक सागरातील वातावरण आणि त्याचा पावसावर होणारा परिणाम अनेक वर्षांपूर्वी लक्षात आला. त्यांनी त्यामागे काय कारण आहे हे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळचे विज्ञान आजच्यासारखे प्रगत नव्हते. त्यांच्या अल्प बुद्धीनुसार त्यांनी, 'हा लहान बालकाने मांडलेला खेळ असावा' असा अंदाज केला. आता विज्ञानाची चांगली प्रगती झाली आहे. पृथ्वीच्या वातावरणावर प्रभाव टाकणारे अनेक घटक आता अभ्यासले जात आहेत. तरीही हे मूळ स्पॅनिश शब्द कायम राहिले आहेत.

एल निनो आणि ला निना पृथ्वीच्या विविध भागांत आपला प्रभाव पाडतात. पृथ्वीच्या काही भागांत अतिवृष्टी होते, तर काही भागांत वातावरण खूप तापते. यावर प्रत्येक देश उपाययोजना करण्याचा प्रयत्न करीत असतात. आपल्या देशाचा विचार करावयाचा झाल्यास असे दिसते की, एल निनोचा सर्वांत जास्त प्रभाव राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांवर झाला आहे. त्यामुळे या राज्यातील पिके प्रभावित झाली आहेत. पिण्याचे पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. जनावरांना चारा कमी पडू लागला आहे. याहीपेक्षा मोठे संकट पुढे आहे. हवामान शास्त्रज्ञांच्या मते एल निनो आणखी प्रबळ होतो आहे. पॅसिफिक समुद्रावरील वातावरणाचे तापमान वाढले आहे. त्यामुळे यावर्षी हिवाळ्यात पुरेशी थंडी पडणार नाही. एल निनोचा प्रभाव जानेवारी फेब्रुवारी पर्यंत राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. काही अभ्यासकांच्या मते हा प्रभाव पुढे देखील सुरू राहण्याची शक्यता आहे. असे जर झाले तर पुढच्या वर्षीचा पाऊस देखील कमी होण्याची शक्यता आहे. यावर्षीच्या नापिकीने आत्ताच खेड्यांतून शहाराकडे स्थलांतर व्हायला लागले आहे. ही परिस्थिती जर आणखी बिघडली तर काय होईल हे सांगता येत नाही.

आलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. परंतु तेवढ्याने ही समस्या सुटेल असे वाटत नाही. शासनाच्या प्रयत्नांना सामान्य माणसांनी देखील हातभार लावण्याची गरज आहे. उपलब्ध असलेले पाणी काटकसरीने वापरणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पडलेले पावसाचे पाणी जमिनीत कसे मुरेल यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे. शोषखड्डे तयार करणे, जलाशयांची खोली वाढविणे, लहान लहान पाटबंधारे बांधणे अशा उपायांनी पाणी अडवता येते असे आपल्याच राज्यातील काही गावांनी करून दाखविले आहे. त्याचा कित्ता गिरविण्याची गरज आहे. नाहीतर वर्षानुवर्षे याच समस्येला तोंड देत राहावे लागेल.

हवामान बदल ही काही आजची घटना नाही. ती अनादीकाळापासून चालत आलेली परंपरा आहे. अलीकडच्या काळात मात्र त्यांचे चटके जास्त जाणवू लागले आहेत. ही झड कमी करायची असेल तर हवामान बदलाचा सखोल अभ्यास करून, येणाऱ्या संकटांची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला उत्तम दर्जाचे हवामान–तज्ज्ञ निर्माण करणे आवश्यक आहे. विज्ञानाच्या इतर शाखांबरोबरच 'हवामान–शास्त्र' शाळा– महाविद्यालयांतून शिकवणे आवश्यक आहे. संशोधन वृत्ती असलेल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर या अभ्यासक्रमाला प्रतिसाद द्यावा. असे झाले तर आगाऊ सूचना देऊ शकणारे हवामान–तज्ज्ञ आपल्या देशात पुरेशा प्रमाणात निर्माण होतील अशी अशा बाळगू या.

– डॉ. सुधाकर आगरकर



व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक १०/ऑक्टोबर २०२६

संपादक
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३१ वे/अंक ४ था)

कार्यालय/पत्रव्यवहार
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org
vpmt1935@gmail.com

मुद्रणस्थळ :
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ९१५२४८७७६५
Email:perfectprints@gmail.com

अनुक्रमणिका

१)	संपादकीय	डॉ. सुधाकर आगरकर	
२)	भारतातील प्राचीन विद्यापीठे	श्री दिलीप नारायण वंडलकर	२
३)	२०२६चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार : विश्वाकडे पाहण्याची नवी दृष्टी	सुहास भ. नाईक-साटम	५
४)	मागे वळून पाहताना (भाग - २)	सौ. कालिंदी कोल्हटकर	७
५)	परिसर वार्ता	संकलित	९

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


भारतातील प्राचीन विद्यापीठे

आपल्या देशाला ज्ञानाची मोठी परंपरा आहे. हे ज्ञान पुढच्या पिढीला देण्यासाठी देशात जागोजागी गुरुकुले स्थापन करण्यात आली होती. याखेरीज उच्च शिक्षण देण्यासाठी विद्यापीठे स्थापन करण्यात आली होती. बिहारमधील 'नालंदा', पंजाबमधील 'तक्षशिला' ही नावे आपल्या कानावर वारंवार पडतात. याखेरीज आपल्या देशात अनेक विद्यापीठे कार्यरत होती. या विद्यापीठांत भारतीय विद्यार्थी तर होतेच, त्याचबरोबर इतर देशांतील विद्यार्थी देखील मोठ्या प्रमाणावर येथे शिक्षण घेण्यासाठी येत असत. या विद्यापीठाची माहिती देणारी ही लेखमाला आहे.

सम्राट अशोकाने आपल्या राज्यात अनेक ठिकाणी विहार आणि विद्यापीठे स्थापन केली. त्यापैकी एक आहे ते मध्य प्रदेशातील उज्जैन या गावाजवळ स्थापन केलेले विद्यापीठ. ते 'उज्जैयिनी विद्यापीठ' म्हणून नावारूपाला आले. अनेक वर्षे या विद्यापीठात ज्ञानदानाचा यज्ञ चालू होता. याच विद्यापीठाची माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे. – संपादक

१. उज्जैयिनी विद्यापीठ

सम्राट अशोकाची पत्नी गरोदर असतानाची ही घटना आहे. एकदा एकांतात अशोकाने विदिशेस पृच्छा केली, 'देवी, आपली काही इच्छा असेल तर ती सांगा.' त्यावर विदिशेने 'त्यांच्या पहिल्या भेटीच्या जागी 'विहार' बांधून द्यावा' असे सांगितले. राजा चमकलेच! पण त्यांनी आलेल्या क्रोधावर तात्काळ नियंत्रण मिळवत समजावून सांगितले, 'प्रिये! मी पडलो राजकारणी. मला राजकारण आणि धर्मकारण या दोन्ही डग्यांच्या तालावर नाचता येणार नाही. माझ्या मते जेंव्हा राजनीती धर्माशी जुळून जाते, तो धर्म आपली पवित्रता सोडून देतो, तर राजनीती आपली मर्यादा! अशावेळी आस्था माणसाच्या विवेकावर आणि सत्ता सत्यावर भारी पडते. तसेच जेंव्हा धर्म मनुष्यास जोडण्याऐवजी सत्तेचा शस्त्र होतो, तेंव्हा विनाशाचा केवळ संभवच नाही–तर अनिवार्य परिणाम होत असतो. आता माझ्या मनातले कथन करतो. बघ तुला आवडले तर! पुरातन काळात याच उज्जैयिनी नगरीत इथल्याच क्षिप्रेच्या तटावरील वनात युगांतर आलेत आणि सांदिपनी श्रृषींच्या आश्रमात शिक्षण घेतले. त्या काळातील गुरुकुलाचे वर्धन सर्वच विद्यापीठांत व्हावे, अशी मनीची इच्छा आहे. अर्थात तुझ्या विहाराची कल्पना मी मुळात नाकारत नाही, पण सध्या विद्यापीठ ही आपली प्राथमिकता असावी असे मला वाटते.' प्रियदर्शनांचे ते मधूर बोल आणि विचारांची स्पष्टता अवाक् होऊन विदिशा अशोकाकडे बघतच राहिली.



विदिशेची संमती मिळताच अशोक विद्यापीठ निर्मितीच्या कामाला लागले. अमात्य राधिककाकांना त्याने विविध विषयांतील निपुण आचार्यांना आमंत्रण देऊन, नव विद्यापीठास योगदान देण्यास, त्यांचे व विद्यार्थ्यांचे आवास, विद्यापीठ भवनांची निर्मिती, ग्रंथालये आणि इतर साधनसामग्रीची जुळवणी करण्यास सांगितले. उपराजांच्या निवेदनाची पुरेपूर दखल घेत राधागुप्तांनी लवकरच एक देखणे विद्यापीठ उभारले. काही राजकीय भवनांचा

उपयोगही या कार्याकरिता करण्यात आला. नूतन विद्यापीठाचे उद्घाटन अर्थातच राजपुत्र जन्मदिनी (साल इ. स. पूर्व २८४) करण्यात आला.

उज्जयिनी विद्यापीठाची सुरुवातही मजेशीर झाली. अमात्य राधागुप्त हे महान आचार्य चाणक्यांचे पट्टशिष्य होते. आचार्यांनी वानप्रस्थी जाण्याआधी पाटलीपुत्रात गंगेच्या किनारी असलेल्या त्यांच्या झोपडीवजा आश्रमात स्वहस्ते सिद्ध केलेल्या अर्थशास्त्र, गणित आणि वास्तूशास्त्र या विषयांच्या मूळप्रती राधिककाकांना सोपवल्या होत्या. 'केल्याने होते आहे रे, आधी केलेची पाहिजे' या उक्तिप्रमाणे राधागुप्तांनी हे विषय स्वत:च या नव विद्यापीठात विनामोबदला शिकवण्यास पुढाकार घेतला. हळूहळू दर्शनशास्त्र, संस्कृत (देवभाषा), पाली (त्या काळची बोलीभाषा), रसशास्त्र (रसायनशास्त्र), आयुर्वेद, शेती व पशूपालन, पाकशास्त्र, खगोलशास्त्र, शिल्पशास्त्र (दगड तसेच काष्ठ), भूशास्त्र, भूगर्भशास्त्र, युद्धशास्त्र, नागरिकशास्त्र असे त्या-त्या शास्त्रांचे तज्ज्ञ जसजसे उपलब्ध होत गेले तसतसे त्या विषयांचे अध्यापन-अध्ययन सुरू होत गेले.

मौर्य राजवटीच्या अस्तानंतर उज्जैयिनीच्या सिंहासनावर भोज (परमारवंश), गुप्त वंशीय शासक आरूढ झाले. त्या दोन्ही राजवटींनी उज्जैयिनी विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी बरीच मेहनत घेतली. त्यातून त्या राजवटींना भरपूर फायदासुद्धा झाला. त्याचा प्रत्यय आजही आपणांस बघावयास मिळतो. उदा - परमारांच्या ताब्यात माळवा आणि कोंकण किनारपट्टी एवढा विस्तृत प्रदेश होता. सार्थवाहकांच्या सुरक्षेसाठी त्यांनी किनारपट्टीला लागून असलेल्या महामार्गावर किल्ले बांधले, रस्ते-वाटा विस्तृत केल्या, त्यावर दुतर्फा झाडे लावली आणि दर अर्धा मैलाच्या अंतरावर विहिरी खणून पिण्याच्या पाण्याची सोय वाटसरूंना उपलब्ध करून दिली. अर्थात त्यांनी या मार्गांच्या रहदारीवर जकात लावला. रस्ते बांधणी, त्यांची नियमित देखभाल, सुरळीत रहदारी नियंत्रण, जकात वसुली ही व इतर कामे तंतोतंत यशस्वी करण्यासाठी परमारांनी उज्जैयिनी विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या राजवटीत सामावून घेत त्यांना या कामास लावले. परमारवंशीय राजवटीतील बांधकाम किती उत्कृष्ट दर्जाचे होते, हे विजयदुर्गास भेट दिल्यानंतर समजून येते. इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी या दुर्गाचा ताबा घेतल्यानंतर त्यांनी परमारकालीन अंबरखान्यावर मजला चढवत विश्रामगृह उभारले. कालांतरात हे विश्रामगृह समुद्री वाऱ्यांचा झंझावात सोसू शकले नाही व भुईसपाट झाले; मात्र पुरातन अंबरखाना आजही दिमाखात उभा आहे. याच परमार वंशीय कुळातील राजा भर्तुहरी याने राज्यत्याग करून विरक्ती पत्करली आणि नाथपंथ स्वीकारला. या पंथात ते आजही 'सहावे नाथ' म्हणून ज्ञात आहेत. उज्जायिनी विद्यापीठात दक्ष झालेल्या या राजाने दर्शनशास्त्रावर टीका लिहिल्या. त्या बघण्याचा योग अस्मादिकास परळी-वैजनाथ येथे वेस्टर्न कोलफिल्ड्स तर्फे सदस्य म्हणून काम बघताना आला. वर्ष २००२ चे होते आणि दिवस होता नागपंचमीचा. त्या दिवशी मुद्दाम सुटी घेऊन परळी - गंगाखेड मार्गानजीक असलेल्या भर्तृहरी समाधी स्थळी पोहोचलो. मंदिर लहानसे असले तरी ते बरेच पुरातन असल्याचे पाहताक्षणीच जाणवले. देवळा शेजारीच तेवढीच पुरातन 'बाहुली विहीर' आहे. मंदिरात एका आलमारीत भर्तृहरी रचीत दर्शन शास्त्रावरील त्या टीका दुरूनच पाहण्यास मिळाल्या. बाहेर आलो आणि दुर्मीळ घटना पाहण्यास मिळाली. या दिनी मुंग्या सूर्योदयापासून डोक्यावर सूर्य येईस्तोवर माणूसभर उंचीचे वारूळ तयार करतात आणि त्यानंतर सूर्य मावळेपर्यंत तो स्वत:च तोडूनही टाकतात. ही घटना शेकडो वर्षांपासून नागपंचमीच्या दिनी घडत असते आणि ती अनुभवण्याची संधी मिळाली, यातच मी धन्य झालो.

भर्तृहरीनंतर त्याचा धाकटा भ्राता विक्रम हा उज्जैयिनीच्या सिंहासनावर आरूढ झाला. तोही तेवढाच ज्ञानयोद्धा निपजला. त्याच्याच कारकिर्दीत 'विक्रम आणि वेताळ' हे कथानक सिद्ध केले. यातील प्रश्नोत्तरी गाभा तत्त्वचिंतनीय विचारशैलीचा एक स्वतंत्र विषय ठरला. याच विक्रमादित्याने 'विक्रमसंवत' ही नवीनच कालगणना सुरू केली. त्यासाठीचे ज्ञान त्याला उज्जयिनी विद्यापीठातूनच मिळाले हे निश्चित.

मौर्य, भोज राजांपासून सुरू झालेला उज्जैयिनीचा सुवर्णकाळ नंतरच्या गुप्त काळातही सुरू होता. खगोलशास्त्रीय ज्ञान गणितीय दृष्टीने आणखी अचूक व्हावे, ते पडताळून पाहता यावे यासाठी आणि कर्कवृत्त उज्जैन वरूनच जात असल्याने विद्यापीठ समितीने वेधशाळा बांधून देण्याचा अनुनय शासक गुप्तांना केला. विद्यापीठाचा अनुनय रास्तच होता, नव्हे ती काळाची गरज होती. त्यामुळे शासकांनी लागलीच वेधशाळा बांधून दिली. त्यातून वराहमिहीर, ब्रम्हगुप्त आदी अनेक तज्ज्ञ कालौघात उज्जैयिनी विद्यापीठाकडे आकर्षित झाले. त्याचा व्हायचा तो उपयोग सर्वांनाच झाला. खगोलीय घटनांचा नवा आयाम तयार झाला. सारे जग भारताकडे कौतुकाने बघू लागले. भाषाशास्त्रात याच विद्यापीठाच्या पाणिनीने देवभाषेसाठी व्याकरण तयार केले. यातून संस्कृत भाषेची शुद्धता जपण्यास मदत झाली. ते एवढ्यावरच थांबले नाहीत; तर त्यांनी पर्शियन भाषेसाठीसुद्धा व्याकरण सिद्ध केले व त्याही भाषेची शुद्धता जपली. महर्षी पाणिनीच्या या पर्शियन भाषेच्या योगदानाबद्दल 'तेहरान विद्यापीठाने' डिसेंबर २०१८ मध्ये इंडो-पर्शियन सांस्कृतिक मंडळातर्फे एक संगोष्टही घडवून आणली होती.

उज्जैयिनी विद्यापीठाची गाथा इथेच थांबत नाही. याच विद्यापीठाच्या मुशीत तयार झालेले महामानव कालिदासांनी अभिज्ञान शाकुंतलम्, मेघदूत आदी अनेक काव्यात्मक रचना व नाटके लिहून साहित्यविश्वात भारताचे नाव जगात अमर करून ठेवले; तर वात्सायनाने 'कामसूत्र' लिहून ते गुप्तज्ञान सर्वज्ञ केले. या व अशा अनेक विद्यार्थ्यांचे कौतुक उज्जैयिनी विद्यापीठाने अनुभवले आहे. कोणत्याही विद्यापीठाचे श्रेष्ठत्व त्या विद्यापीठात झालेल्या संशोधनाने व त्याने ठरवून दिलेल्या वैचारिक दृष्टीकोनातून होत असते. याबाबत उज्जैयिनी विद्यापीठ सतत हजार वर्षेतरी आघाडीवर होते. तो एक इतिहास या विद्यापीठाने घडवला आहे. त्यानंतर... काळ पुढे सरकत होता. नवनवी स्थित्यतरं घडत होती. भारतवर्ष सुवर्णतेजाने तळपत होते. पूर्व आशिया भारताकडे नवोन्मेषाच्या आशेने; तर पश्चिम आशिया द्वेषाच्या आणि मत्सराच्या भावनेने बघत होता... अशात आठव्या शतकात अरबस्थानात मुस्लीम धर्माचा उदय झाला. इतर धर्माप्रमाणे त्याची तत्त्वे चांगली असली तरी ती वापरणारी माणसं राक्षसी वृत्तीची होती. संघर्ष त्यांच्या रक्तातच होता. पाहता-पाहता त्यांनी लागून असलेला युरोप खंडाचा काही भाग ताब्यात घेतला. मात्र यामुळे त्यांचे इप्सित साध्य झाले नाही. हा एकप्रकारे एका भिकाऱ्याने दुसऱ्या भिकाऱ्याकडे डल्ला मारल्यासारखा प्रकार होता. तेव्हा त्यांनी आपली तिरकस नजर भारताकडे वळवली. त्यांनी शे-दीडशे भारतभूच्या वेशीवर सातत्याने आक्रमणे केली. वेशीवर जम बसताच त्यांनी मुख्य भूमीवर आक्रमणे करायला सुरुवात केली व त्यात यशही मिळवले. आता त्यांची वक्रनजर येथील संस्कृती आणि प्रार्थना स्थळांवर पडली. त्याचा व्हायचा तो परिणाम झालाच. भारताची ज्ञानदानाची केंद्रे त्यास बळी पडली. उज्जैयिनी विद्यापीठासही अतोनात नुकसान सहन करावे लागले आणि येथील शिक्षणव्यवस्था धुळीस मिळाली.

श्री. दिलीप नारायण वंडलकर
४, नरकेसरी सोसा., उज्ज्वलनगर, नागपूर.
मो.क्र.९८३४६३६६५५
इ.मेल - wandalkardillipgmail.com

२०२६चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार : विश्वाकडे पाहण्याची नवी दृष्टी

फ्रान्सिस हाल्झेन या प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञास २०२६ चा नोबेल पुरस्कार मिळाला. त्याच्याविषयी प्रस्तुत विषयाच्या संबंधित थोडक्यात माहिती – संपादक

२०२६चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार बेल्जियन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ फ्रान्सिस हाल्झेन यांना प्रदान करण्यात आला आहे. अमेरिकेतील विस्कॉन्सिन-मॅडिसन विद्यापीठात कार्यरत असलेल्या हाल्झेन यांनी 'आइसक्यूब न्यूट्रिनो ऑब्झर्व्हेटरी'च्या उभारणीत आणि खगोलभौतिकीय स्रोतांमधून येणाऱ्या उच्च-ऊर्जा न्यूट्रिनोंच्या शोधात निर्णायक योगदान दिले. या संशोधनामुळे विश्वाचा अभ्यास करण्यासाठी एक नवी दृष्टी खुली झाली आहे.

न्यूट्रिनो हे विद्युतभाररहित आणि अत्यंत सूक्ष्म वस्तुमान असलेले मूलभूत कण आहेत. ते प्रामुख्याने दुर्बल अणुबलाद्वारे आणि गुरुत्वाकर्षणाद्वारे पदार्थाशी परस्परसंवाद करतात. त्यामुळे त्यांचा शोध घेणे अत्यंत अवघड असते. दर सेकंदाला असंख्य न्यूट्रिनो पृथ्वी आणि आपल्या शरीरातूनही आरपार जात असतात; मात्र त्यांपैकी अत्यंत कमी न्यूट्रिनो पदार्थाशी अभिक्रिया करतात. त्यांच्या या वैशिष्ट्यामुळेच खगोलशास्त्रात त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रकाशाच्या तुलनेत न्यूट्रिनो मोठ्या प्रमाणातील पदार्थातून जवळजवळ अडथळ्याविना प्रवास करू शकतात. त्यामुळे पारंपरिक दुर्बिणींना सहज दिसू न शकणाऱ्या विश्वातील प्रदेशांची माहिती ते पृथ्वीपर्यंत पोहोचवू शकतात.

अंटार्क्टिकामधील बर्फाचा वापर एक प्रचंड न्यूट्रिनो डिटेक्टर म्हणून करता येईल, ही कल्पना फ्रान्सिस हाल्झेन यांनी पुढे नेली. त्यातूनच दक्षिण ध्रुवावर 'आइसक्यूब न्यूट्रिनो ऑब्झर्व्हेटरी' उभारली गेली. ही आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक मोहीम सुमारे एक घन किलोमीटर आकाराच्या अंटार्क्टिक बर्फामध्ये खोलवर बसवलेल्या हजारो प्रकाशसंवेदकांचा वापर करते. उच्च-ऊर्जा न्यूट्रिनोंचा शोध घेण्यासाठी हे जगातील सर्वांत मोठ्या वैज्ञानिक उपकरणांपैकी एक आहे.

आइसक्यूब न्यूट्रिनोंचा थेट शोध घेत नाही. एखादे उच्च-ऊर्जा न्यूट्रिनो बर्फातील अणुकेंद्राशी क्वचितच परस्परसंवाद करते तेव्हा त्यातून विद्युतभारित दुय्यम कण निर्माण होतो. हा कण बर्फामध्ये प्रकाशाच्या त्या माध्यमातील टप्प्याच्या वेगापेक्षा अधिक वेगाने प्रवास करताना निळसर प्रकाश निर्माण करतो. या प्रकाशाला चेरेन्कोव्ह किरणोत्सर्ग म्हणतात. आइसक्यूबमधील प्रकाशसंवेदक हा अत्यंत क्षीण प्रकाश टिपतात. प्रकाशकण कोणत्यावेळी आणि कोणत्याठिकाणी आढळले, याचे विश्लेषण करून शास्त्रज्ञ मूळ न्यूट्रिनोची दिशा आणि ऊर्जा निश्चित करू शकतात.

उच्च-ऊर्जा असलेल्या खगोलभौतिकीय न्यूट्रिनोंचा शोध आधुनिक खगोलशास्त्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. अशा न्यूट्रिनोंची निर्मिती विश्वातील अतिशय ऊर्जावान वातावरणात होऊ शकते. सक्रिय दीर्घिका तसेच इतर अत्यंत ऊर्जावान वैश्विक प्रणाली अशा न्यूट्रिनोंचे स्रोत असू शकतात. न्यूट्रिनो विद्युतभाररहित असल्यामुळे अवकाशातील चुंबकीय क्षेत्रांमुळे त्यांच्या मार्गात प्रकाशाप्रमाणे वाकणे होत नाही. त्यामुळे ते

ज्या दिशेने पृथ्वीवर पोहोचतात, त्या दिशेवरून त्यांच्या स्रोतांविषयी महत्त्वाची माहिती मिळू शकते.

आइसक्यूबच्या संशोधनामुळे न्यूट्रिनो खगोलशास्त्र ही नवी वैज्ञानिक शाखा विकसित होण्यास मोठी मदत झाली आहे. अनेक शतकांपासून खगोलशास्त्रज्ञांनी प्रामुख्याने दृश्यमान प्रकाश, रेडिओ लहरी, क्ष-किरणे यांसारख्या विद्युतचुंबकीय किरणोत्सर्गाच्या माध्यमातून विश्वाचा अभ्यास केला आहे. न्यूट्रिनो मात्र विश्वाविषयी वेगळ्या प्रकारची माहिती देतात. अत्यंत घन आणि ऊर्जावान प्रदेशातून बाहेर पडून ते अब्जावधी प्रकाशवर्षांचा प्रवास करू शकतात आणि आपल्या निर्मितीशी संबंधित माहिती पृथ्वीपर्यंत पोहोचवू शकतात.

हाल्झेन यांचे योगदान केवळ खगोलभौतिकीय न्यूट्रिनोंच्या शोधापुरते मर्यादित नाही. इतक्या दुर्मीळ कणांचा शोध घेण्यासाठी प्रचंड आकाराचा डिटेक्टर आणि अत्याधुनिक माहिती-विश्लेषण पद्धती आवश्यक होत्या. अंटार्क्टिकातील नैसर्गिक बर्फाचा एक विशाल वैज्ञानिक उपकरण म्हणून वापर करण्याच्या त्यांच्या कल्पनेमुळे अशक्य वाटणारे वैज्ञानिक आव्हान प्रत्यक्षात आणता आले. आज आइसक्यूबच्या माध्यमातून अंतराळाच्या गाभ्यातून पृथ्वीवर येणाऱ्या कणांचा अभ्यास करणे शक्य झाले आहे.

आइसक्यूब प्रकल्प हा आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक सहकार्याचाही उत्तम नमुना आहे. जगातील विविध देशांतील संशोधक आणि वैज्ञानिक संस्थांनी या वेधशाळेची उभारणी, संचालन आणि त्यातून मिळणाऱ्या माहितीच्या विश्लेषणात योगदान दिले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील वैज्ञानिक प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले.

त्यामुळे २०२६चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार हा विश्वाच्या आकलनातील एका महत्त्वाच्या टप्प्याचे प्रतीक आहे. या पुरस्कारामुळे विश्वाचा अभ्यास करण्यासाठी एका नव्या 'संदेशवाहका'ला मान्यता मिळाली आहे. न्यूट्रिनोंच्या माध्यमातून कणभौतिकशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र यांच्यातील दुवा अधिक दृढ झाला असून, विश्वातील सर्वाधिक ऊर्जावान घटनांचा अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिकांना नवे साधन मिळाले आहे.

फ्रान्सिस हाल्झेन यांच्या आइसक्यूबमधील योगदानामुळे विश्वाकडे पाहण्याची मानवाची क्षमता एका नव्या पातळीवर पोहोचली आहे. उच्च-ऊर्जा न्यूट्रिनोंचा शोध घेऊन विश्वातील अतिशय शक्तिशाली प्रक्रियांचा अभ्यास एका नव्या दृष्टिकोनातून करता येऊ लागला आहे. नावीन्यपूर्ण वैज्ञानिक कल्पना, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांच्या जोरावर विश्वाच्या आकलनात आमूलाग्र बदल घडवून आणता येतो, हे या संशोधनाने सिद्ध केले आहे. त्यामुळे २०२६चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार हा केवळ एका सूक्ष्म कणाच्या अभ्यासाचा गौरव नसून, विश्वाकडे पाहण्यासाठी उघडलेल्या एका नव्या खिडकीचा उत्सव आहे.

सुहास भ. नाईक-साटम
मुख्य कार्यकारी अधिकारी
नॅशनल सेंटर फॉर सायन्स कम्युनिकेटर्स, मुंबई
फोन : ९१-९८२०००० ७२६
ईमेल : suhasnasagmail.com

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

मागे वळून पाहताना
(भाग - २)

कालिंदी कोल्हटकर ह्या वि.प्र.मं.च्या ए.के.जोशी इंग्लिश मीडियमच्या एक निस्पृह, तसेच तन-मनाने एकाग्र झालेल्या माजी मुख्याध्यापिका. शिक्षणक्षेत्रात प्रवेश केल्यापासूनच्या आठवणी त्यांना सिंहावलोकनाद्वारे जिवंत कराव्याशा वाटल्या हे महत्त्वाचे. त्या आठवणींचा हा भाग २ - संपादक

मागील अंकाचा उर्वरित भाग

१) माध्यमिक विभागासाठी राबविण्यात आलेले उपक्रम (१९८६ ते २०२५) : भारत स्काऊट्स व गाईड्स : सन १९८६ मध्ये मला इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या स्काऊट-गाईड पथकाची जबाबदारी देण्यात आली. या उपक्रमामध्ये विद्यार्थी पंतप्रधान ढाल स्पर्धेसाठी पात्र ठरले. तसेच त्यांनी अनेक वेळा जागतिक व राष्ट्रीय जांबोरी शिबिरांमध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे सर्व उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरले. माझ्या सर्व स्काऊट व गाईड शिक्षिकांनी या कार्यात मोलाचे सहकार्य केले. व्यक्तिगत विकासासाठी या सर्व उपक्रम खूप मोठा वाटा आहे! माझ्या सर्व स्काऊट व गाईड शिक्षिकानी अतोनात मेहनत करून विद्यार्थ्यांना ह्या उपक्रमासाठी तयार केले व अनेक बक्षीसे विद्यार्थ्यांनी मिळवली.

२) **चित्रकला :** मध्यवर्ती चित्रकला परीक्षा व प्राथमिक चित्रकला परीक्षा यांसाठी विद्यार्थ्यांना शाळेतील चित्रकला शिक्षिका मार्गदर्शन करून तयार करतात. विद्यार्थ्यांना या परीक्षांमध्ये नेहमीच उत्कृष्ट श्रेणी प्राप्त होते.

३) **सहशालेय उपक्रम :** विविध नाट्यस्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना तयार केले जाते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आजपर्यंत भरघोस यश संपादन करून अनेक पारितोषिके मिळविली आहेत. तसेच शिक्षकांनी सादर केलेल्या नाट्य-प्रयोगांनाही अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शिक्षकांचा उत्साह व सहभाग नेहमीच प्रेरणादायी ठरला आहे.

४) **रोशनी मासिक :** दरवर्षी डॉक्टर साहेबांच्या वाढदिवसानिमित्त 'रोशनी' मासिकाचे प्रकाशन करण्यात येते. या मासिकामध्ये शाळेच्या तिन्ही विभागांचा अहवाल, तसेच विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर लिहिलेले लेख प्रकाशित केले जातात. त्याच दिवशी हस्तकला व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. विज्ञान प्रदर्शनाची सुरुवात सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून झाली.

५) **शालेय संसद :** विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेविषयी आदर व काम करण्याची इच्छा निर्माण व्हावी म्हणून २००३-०४ साली शालेय संसदेची स्थापना झाली. या उपक्रमाद्वारे मुलांना शाळेसाठी कार्यरत होण्याची प्रेरणा दिली गेली. विद्यार्थीप्रमुख व विद्यार्थिनीप्रमुख यांची निवड, तसेच विविध खात्यांची स्थापना करण्यात आली. उदा. गृह खाते, परराष्ट्र खाते, शिस्त खाते इत्यादी. विद्यार्थ्यांची निवड वर्गामध्ये निवडणूक घेऊन करण्यात येते, तर विद्यार्थिनीप्रमुख, सहाय्यक विद्यार्थिनीप्रमुख, विद्यार्थीप्रमुख व सहाय्यक विद्यार्थीप्रमुख यांची निवड मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्यातर्फे करण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढून अनेक चांगल्या उपक्रमांची सुरुवात झाली. दर महिन्याला संसदेच्या बैठका होऊ लागल्या. प्रत्येक खात्यासाठी एक प्रमुख शिक्षिका नेमण्यात येते.

६) आमचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितल्याप्रमाणे विविध विषयांची मंडळे २००५-२००६ मध्ये स्थापन झाली. विद्यार्थी वेगवेगळे उपक्रम आनंदाने व उत्साहाने करू लागले. प्रत्येक विषयाच्या मंडळासाठी एक प्रमुख शिक्षिका नेमण्यात येते.

आपण व्यस्त राहिलं की सर्व कामं सोपी होतात, तर आपण आळशी असलो की सर्वकाही कठीण असते.

एकदा आमचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी मला बोलाविले व सांगितले, 'कोल्हटकर, तुमचे विद्यार्थी आता चीनला जाणार! तयारी सुरू करा!' मी म्हटले, 'सर, चीनला!!' मनात खूप गोंधळ उडाला. मग त्यांनी CASTIC बद्दल सर्व समजावून सांगितले. त्यासाठी विद्यार्थी व विज्ञान प्रकल्प निवड करायला सांगितले. मन आनंदाने तुडुंब भरले होते! मी माझ्या कार्यालयात गेले. विचार करू लागले. मग विज्ञान शिक्षिकांना बोलावले. आमच्या विज्ञान प्रदर्शनात व इतर ठिकाणी सादर केलेल्या विज्ञान प्रकल्पांबाबत विचार करू लागलो आणि एक विज्ञान प्रकल्प निवडला. तो विज्ञान प्रकल्प 'जिज्ञासा' या संस्थेला पाठवलेला होता. अंतिम फेरीपर्यंत विद्यार्थ्यांची निवड झाली. पालकांना बोलावले, कारण खर्चाचा प्रश्न होता. पालकांनी खूप सहकार्य केले. तिकीट व इतर खर्च त्यांनी केला, तर त्या विज्ञान प्रकल्पाच्या नमुन्याचा व त्यासंबंधीच्या साहित्याचा खर्च शाळेने केला. डॉ. विजय बेडेकर, श्री. आगरकर सर, तसेच भोळे शिक्षिका व साठे शिक्षिका विद्यार्थ्यांबरोबर चीनला गेल्या. चार विद्यार्थी निवडून पाठविण्यात आले होते आणि आनंदाची गोष्ट म्हणजे आमच्या त्या विज्ञान प्रकल्पाला बक्षीस मिळाले. पहिले आंतरराष्ट्रीय स्तरावरील बक्षीस! खूप आनंद झाला!

आमचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे मी आभार मानते. या विज्ञान प्रकल्पासाठी डॉ. आगरकर सरांचे मार्गदर्शन खूप मोलाचे होते. विद्यार्थ्यांना दिलेल्या मार्गदर्शक सूचना खूप मौल्यवान होत्या.

७) अशाप्रकारे २०१३-१४ पासून आंतरराष्ट्रीय स्तरावरील यश विद्यार्थ्यांना व शाळेला मिळू लागले. याच वर्षी चायना ॲडव्हान्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये आमच्या विद्यार्थ्यांना बक्षीस मिळाले. CASTIC, चीन येथे आमच्या विद्यार्थ्यांना व शाळेला सलग चार वर्षे हे बक्षीस मिळत होते. विद्यार्थी, शिक्षक, श्री. आगरकर सर व कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर चीनमधील वेगवेगळ्या प्रांतांना जाऊ लागले. कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व आगरकर सर यांच्या प्रोत्साहनामुळे शाळेला हे यश संपादन करणे शक्य झाले. मी त्यांची अतिशय ऋणी आहे!

८) इन्स्टिट्यूट ऑफ ओरिएंटल स्टडीजचे प्रमुख मा. डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली लीग ऑफ कॉमनवेल्थ टीचर्स एक्स्चेंज प्रोग्रॅम अंतर्गत मेघा लाड व रोहिणी नाईक यांनी युनायटेड किंग्डम (यू.के.) ला भेट दिली. यू.के. मधील शिक्षिकांचा समूहही येथे येऊन शाळेला भेट देऊ लागला. हा उपक्रम २००० पासून सुरू झाला.

त्यांचे स्वागत करणे व त्यांना शाळेविषयी माहिती देण्याचे काम अर्थातच मला करावे लागले. ही माहिती मी सादरीकरणाद्वारे (पी.पी.टी.) देऊ लागले, कारण कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती देण्यास सांगितले होते. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान शिकण्यास आमची तयारी सुरू झाली. याचा उपयोग १ ऑगस्टला होणाऱ्या कार्यक्रमासाठीही होऊ लागला.

वर्गभेटी, शिक्षिका व विद्यार्थ्यांशी संवाद, असे महत्त्वाचे उपक्रम होऊ लागले. संध्याकाळी सर्वजण एकत्र येऊन प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम व्हायचा. यू.के.मधील शिक्षिकांचा पहिला प्रश्न असायचा, 'वर्गात विद्यार्थ्यांची संख्या एवढी मोठी असताना शिक्षिका वर्गाचे व्यवस्थापन कसे करतात?' याचे शिक्षिका अतिशय चांगल्या प्रकारे स्पष्टीकरण देऊन त्यांना समजावून सांगायच्या.

(क्रमशः)

– कालिंदी कोल्हटकर
ब्लॉक नं. १४, २रा मजला, गिरिराज सोसायटी
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या जवळ
नौपाडा, ठाणे – ४००६०२
भ्रमणध्वनी : ९८२०३५४१८०

●●●

माणूस नेहमी प्रगतीशील असला तरच मोठा होण्यासाठी धडपडतो. अल्पसंतुष्ट माणूस निष्क्रीय बनतो.

परिसर वार्ता

– संकलित

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

सांस्कृतिक कलादर्पण

दि. ३० ऑगस्ट रोजी झालेल्या सांस्कृतिक कलादर्पण आयोजित आंतरशालेय विविध कलागुण स्पर्धेत खालील विद्यार्थी विजेते ठरले.

वेशभूषा स्पर्धा –

- चिनांशू दडपे (७ब) – द्वितीय क्रमांक
- यशश्री देवरुखकर (५अ) – द्वितीय क्रमांक
- अन्वित पाबरेकर (६ड) – उत्तेजनार्थ
- मुद्रा दामले (५अ) – उत्तेजनार्थ
- आराध्या मोहिते (५अ)) – उत्तेजनार्थ

वक्तृत्व स्पर्धा

- मुद्रा दामले(५अ) – द्वितीय क्रमांक
- वेदांत जागडे (५अ) – उत्तेजनार्थ
- श्रीराम पडळकर (५अ) – उत्तेजनार्थ
- आरोही गायकवाड (५अ) – उत्तेजनार्थ
- दुर्वा साळुंखे (५अ) – उत्तेजनार्थ

नृत्य स्पर्धा

- आराध्य मोहिते (५अ) – प्रथम क्रमांक
- श्रेया मेष्टे (७अ) – तृतीय क्रमांक
- वेदिका घार्गे (५अ) – उत्तेजनार्थ
- विनया खामकर(७अ)– उत्तेजनार्थ
- ग्रंथा गोरीवले (७अ)–उत्तेजनार्थ

संस्कार भारती केंद्र –

संस्कार भारती केंद्र, कोकण प्रांत यांचेमार्फत 'चारोळी स्पर्धा 'घेतली गेली. या स्पर्धेतून वेदा झेपले (५ अ) हीस प्रथम क्रमांक, तर तनिष्का गुरव (५ ब) या विद्यार्थिनीस द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

रोटरी क्लब ठाणे आयोजित स्तोत्र पठण स्पर्धा

रोटरी क्लब ठाणे आयोजित स्तोत्र पठण स्पर्धेत अंतिम फेरीत गट क्र.२ मधून श्रावणी संतोष बनसोडे (९ब) या विद्यार्थिनीने 'अंयगिरी नंदिनी स्तोत्र' म्हणत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तर श्रिया कापडी या विद्यार्थिनीस शिवतांडव स्तोत्र पठणाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

५ सप्टेंबर शिक्षक दिन – मंगळवार दि. ८ सप्टेंबर रोजी ठाणे भारत सहकारी बँकेच्या प्रतिनिधिंनी शाळेतील सर्व शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सत्कार केला. आणि शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रतिवर्षी ५ सप्टेंबर या दिवशी संपूर्ण भारतभर शिक्षक दिन साजरा केला जातो. शिक्षक दिनाचे औचित्य साधून आपल्या शाळेमध्ये बुधवार दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळ आणि दुपार विभागात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. इ. ७ वी, आणि १० वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी संपूर्ण दिवसभर शिक्षकांची भूमिका पार पाडली. ६ तासिकांनंतर समारोपाचा कार्यक्रम टेरेसवर पार पडला. यावेळी शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांबरोबर इतर विद्यार्थी, तसेच शाळेतील सर्व शिक्षक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका उपस्थित होते. शिक्षकाची भूमिका पार पाडताना त्यांना कसे वाटले हे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सर्वांसमोर सांगितले. सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प व छोटीशी भेटवस्तू देऊन शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. लहान वर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या वर्गावरील दिवसभराच्या तासिकांचा आढावा व त्यांना आलेले अनुभव सर्वांसमोर मांडून शिक्षक झालेल्या

विद्यार्थ्यांचे आभार मानले. माननीय पर्यवेक्षिका मलिये बाई व माननीय मुख्याध्यापिका वाघुले बाई यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शेवटी सर्वांचे आभार मानून गुरुमंत्र आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

शिक्षक गौरव पुरस्कार

१. सन २०२६-२७चा 'ब्राह्मण सेवा संघ, शिक्षण सहायक समिती, ठाणे' यांचेकडून दिला जाणारा शिक्षक गौरव पुरस्कार सौ. नेत्रा श्रीकांत सोनवणे यांना मिळाला. शिक्षण क्षेत्रातील प्रशंसनीय कार्याबद्दल देण्यात आलेल्या या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि श्रीफळ असे असे आहे.

२. खोपोली येथील 'माधव बाग आयुर्वेदिक संस्था' यांच्या तर्फे देण्यात येणाऱ्या २०२६-२७ चा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार श्री. जीवन जाधव यांना प्रदान करण्यात आला.

३. 'लायन्स क्लब ऑफ ठाणे' यांचेकडून शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. सुषमा बोऱ्हाडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.

४. GMRT तर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्पांचे परीक्षण यशस्वीरित्या केल्याबद्दल आपल्या शाळेतील विज्ञान शिक्षिका सौ. उज्ज्वला धोत्रे यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

गणेशोत्सव – दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शाळेत गणेशोत्सव मोठ्या आनंदात उत्साहात साजरा केला. दि. ११ सप्टेंबर रोजी ढोल ताशांच्या वाद्यावर आणि लेझीमच्या तालावर गणेश मूर्तीची स्थापना झाली. या प्रसंगी प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच इंग्रजी माध्यमातील सर्व शिक्षक उपस्थित होते. सर्व विद्यार्थी देखील रंगीबेरंगी कपड्यात उपस्थित होते. यावर्षी गणेश मूर्तीसाठी सजावट डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग शाळेचे कलाशिक्षक श्री. कोळी व श्री. दिघे यांनी केली.



स्त्री कल्याण संघटना ठाणे – दि. २९ ऑगस्ट रोजी झालेल्या स्त्री कल्याण संघटना ठाणे तर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील गट क्र. ७ विभाग एकमधून मुद्रा मंगेश दामले (५अ) या विद्यार्थिनीस प्रथम क्रमांक प्राप्त झाला. आणि विभाग दोनमधून दूर्वा संतोष सोनावणे (५अ) या विद्यार्थिनीस देखील प्रथम क्रमांक प्राप्त झाला. गट क्र. ८ विभाग दोन मधून विनया निलेश खामकर (७अ) हीस द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

ज्ञानप्रबोधिनी – शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी इ. ५वी आणि ६वी आणि ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानप्रबोधिनी तर्फे सौ. पल्लवी मुंगी व सौ. रेश्मा साळी यांनी 'ओळख स्पर्शाची' या कार्यक्रमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी जाणीव जागृती अभियान आयोजित करण्यात आले.

लोकमत आयोजित 'ती'चा गणपती – डॉ. राजेश मडवी फाऊंडेशन प्रस्तुत 'लोकमत' आयोजित 'ती' चा गणपती २०२६ अंतर्गत 'पोस्टर मेकिंग' स्पर्धेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून खालील विद्यार्थी विजयी ठरले.

प्रथम क्रमांक - वेदिका घार्गे (५अ)
द्वितीय क्रमांक - संस्कृती पवार (५अ)
तृतीय क्रमांक - रिद्धीश कदम (५अ)

घनकचरा व्यवस्थापन – दि. २१ सप्टेंबर रोजी स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी अंतर्गत ठाणे महानगरपालिका तर्फे इ. ५वी, ६वी ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'घनकचरा व्यवस्थापन' विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ठाणे महानगरपालिका तर्फे श्री. स्वप्निल उचिक यांनी कचरा म्हणजे काय, कचऱ्याचे विविध प्रकार समजावून सांगितले. कचरा वेगवेगळा गोळा कसा करायला हवा? तसेच कचरा वेगळा करताना कोणकोणती काळजी घ्यायला हवी? याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून माहितीची उजळणी करून घेतली. छान उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटेसे बक्षीस देखील दिले. कार्यक्रमाच्या शेवटी ठा.म.पा. यांचेतर्फे शाळेला सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली.

आंतरशालेय चित्रकला स्पर्धा – श्री समर्थ सेवक मंडळ, ठाणे संचालित शिव समर्थ विद्यालय,माध्य ठाणे यांच्या वतीने आयोजित सुवर्ण महोत्सवी वर्ष निमित्त घेण्यात आलेल्या आंतरशालेय चित्रकलास्पर्धेत खालील विद्यार्थी विजयी घोषित केले.

प्रथम क्रमांक – सोनाली जड्यार (९अ)
द्वितीय क्रमांक – विराज पार्टे (६अ)
तृतीय क्रमांक – सिया पवार(९अ)

DSO स्पर्धा – दि.३० सप्टेंबर रोजी झालेल्या १४ वर्षाखालील जिल्हास्तरीय पिपसाइट एअर रायफल स्पर्धेत आपल्या शाळेतील अभिनंदन शिरसाट याला सुवर्णपदक मिळाले. तसेच याच गटातून झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत आपल्या शाळेतील कार्तिक ठाकरे यास सिल्वर पदक मिळाले. दोन्ही विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्पर्धेसाठी झालेली आहे.



शिक्षक प्रशिक्षण

१. महाराष्ट्र नेवल एन सी सी मुंबई यांच्यावतीने गन फायरिंग प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणामध्ये आपल्या शाळेतील २० एनसीसी कॅडेट्स तसेच ANO श्री. संजय दिघे यांनी सहभाग घेतला. या प्रशिक्षणा दरम्यान कॅडेट्सना शिस्त जबाबदारी एकाग्रता आणि लष्करी प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

२. ठाणे येथे २९ व ३० सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या Heritage Education and INTACH Heritage Clubs या द्विदिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेत सौ. साधना जोशी आणि सौ. नम्रता महाजन या सहभागी झाल्या होत्या.

INTACH, INTACH ठाणे चॅप्टर, अश्वमेध प्रतिष्ठान, इन्स्टिट्यूट फॉर ओरिएंटल स्टडी आणि स्थापत्य संवाद यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

शाळांमध्ये INTACH Heritage Club स्थापन करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निरीक्षण, वारसाभेटी, निसर्गभ्रमंती, प्रकल्पाधारित शिक्षण आणि स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात सहभागी करून घेण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे निसर्ग, इतिहास आणि भूगोल या विषयांशी अधिक घट्ट नाते निर्माण होईल, तसेच आपल्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारशाबद्दल संवेदनशीलता वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ही कार्यशाळा शिक्षकांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक ठरली असून, मिळालेल्या संकल्पना व उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून वारसा संवर्धनाची जाणीव समाजात रुजविण्यास निश्चितच मदत होणार आहे. आपला वारसा – आपली जबाबदारी हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना जागरूक आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी ही कार्यशाळा प्रेरणादायी ठरली.

'निसर्ग मेळा २०२६ – 'पर्यावरण दक्षता मंच आणि रोटरी क्लब ठाणे' आयोजित 'निसर्ग मेळा २०२६' यामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या शाळेतील इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी 'बायो-रांगोळी आणि मास्क-मेकिंग' स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यापैकी विनया खामकर आणि तनिष्का बडगुजर यांना 'बायो रांगोळी' स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले, तर 'मास्क मेकिंग' स्पर्धेत श्रेय सोपारकर याला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

ज्ञान प्रबोधिनी मासिक उपक्रम – शनिवार दिनांक ३ ऑक्टोबर रोजी इ. ७वी आणि ब या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञान प्रबोधिनी' तर्फे विकासिका सत्र घेतले. विज्ञान गीत घेऊन सुरुवात झाली. ज्ञान प्रबोधिनीच्या सभासद आरती, मुग्धा, मधुरा, अंजली यांनी विद्यार्थ्यांसोबत आपले ज्ञानेंद्रिय, त्यांचे महत्त्व आणि काळजी यावर चर्चा केली. यालाच जोडून एखादी कमतरता मनाच्या ताकदीने अणि बुद्धीच्या जोरावर कशी भरून काढली जाऊ शकते हे अरुणिमा सिन्हा यांच्या गोष्टीतून स्पष्ट केले. मोठे ध्येय, जिद्द यावर मुलांशी सुसंवाद साधला. त्यानंतर मागील सत्रात दिलेल्या task चा आढावा घेतला. सर्वांत शेवटी 2 brain exercise अणि त्यानंतर त्रिवार ओंकार घेऊन विकसितेची सांगता झाली.

बालरंगभूमी जल्लोष २०२६ – बालरंगभूमी जल्लोष २०२६ एकल प्राथमिक स्पर्धेतील गायन गटात युवराज बाबर (७ड) यास प्रथम क्रमांक तर यज्ञेश बाबर (५क) या विद्यार्थ्याला वादन गटातप्रथम क्रमांकासाठी सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र मिळाले. याच स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत यज्ञेश बाबर यास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिकाचे स्वरूप चषक व प्रमाणपत्र आहे.

सुरवाणी ज्ञान मंदिर, ठाणे – 'सुरवाणी ज्ञानमंदिर ठाणे' आयोजित स्तोत्र पठण स्पर्धेत इ.९अ मधील गौरांग रिसबूड यांस उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले.

सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

गोकुळाष्टमी – 'नंदाघरी आनंद झाला, श्रीकृष्ण जन्माला आला!'

विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील सणांचे महत्त्व समजावे, भगवान श्रीकृष्णांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांची ओळख व्हावी आणि प्रेम, मैत्री, धैर्य व सदाचार यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजावीत या उद्देशाने शाळेच्या प्राथमिक विभागात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीचे महत्त्व, श्रीकृष्णाचा जन्म आणि त्यांच्या बाललीलांबद्दल माहिती देण्यात आली.



विद्यार्थ्यांनी कृष्णजन्मावर आधारित गीत, कवितासादर करून सर्वांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत **'गोविंदा आला रे!'** च्या जयघोषाने संपूर्ण वातावरण आनंदमय केले. वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेम, मैत्री, एकता, सहकार्य आणि सत्याच्या मार्गावर चालण्याचा संदेश मिळाला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव आनंददायी, संस्कारक्षम आणि संस्मरणीय ठरला.

जर आज तुम्ही कमाईपेक्षा जास्त मेहनत करत असाल तर, खूप लवकर तुम्ही मेहनतीपेक्षा जास्त कमाई करणार.

गणेश चतुर्थी – 'मातीच्या मूर्तीतून साकारली कल्पना, बाप्पाच्या आगमनाने खुलली सर्जनशीलता!'

शाळेच्या प्राथमिक विभागात गणेश चतुर्थी उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना गणेशोत्सवाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व समजावे, तसेच त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात गणरायाच्या स्वागताने व मंगलमय वातावरणात झाली. विद्यार्थ्यांना गणेश चतुर्थीचे महत्त्व, श्री गणेशाचे विविध गुण आणि गणेशोत्सवामागील संदेश याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी गणेशवंदना, भक्तिगीते, कविता आणि अथर्वशीर्ष सादर करून बाप्पाच्या आगमनाचा आनंद व्यक्त केला.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करण्याचा विशेष उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून सुंदर गणेशमूर्ती तयार केल्या. मूर्ती तयार करताना विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत आपल्या कल्पकतेचा आणि कलागुणांचा सुंदर आविष्कार घडवला. या उपक्रमातून 'स्वतः करा आणि अनुभवातून शिका' या संकल्पनेचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.



गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकता, शिस्त, सर्जनशीलता, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व समजले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे गणेश चतुर्थीचा उत्सव आनंददायी व संस्मरणीय ठरला.

खेळातून आरोग्याचा संदेश, पालक विद्यार्थी 'क्रीडा महोत्सव' उत्साहात !

शाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ४ ऑक्टोबर रोजी पालक विद्यार्थी क्रीडा महोत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

व्ही. पी. एम. च्या बेडेकर कॉलेजच्या टर्फ वर २ ऑक्टोबर रोजी माध्यमिक विभागासाठी, तर ४ ऑक्टोबर रोजी पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक विभागासाठी सकाळी ७ वाजता क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी-पालकांनी विविध व नावीन्यपूर्ण क्रीडा उपक्रमामध्ये उस्फूर्त सहभाग घेत खेळाचा मनमुराद आनंद लुटला.



या कार्यक्रमाचे उद्घाटन व्ही. पी. एम. चे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले. या कार्यक्रमात त्यांचे संपूर्ण कुटुंब सहभागी झाले होते. त्याचबरोबर श्री. व सौ. डॉ. बापट कुटुंबीय, श्री. मराठे सर होते. माजी अधिष्ठाता सौ. कोल्हटकर मॅडम यांनी सुद्धा उपस्थिती लावली. कार्यक्रमात डॉ. महेश बेडेकरांनी विद्यार्थी

पालकांशी संवाद साधताना आरोग्याचे महत्त्व सांगितले व ह्या कार्यक्रमासाठी श्री. इनामदार सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अंजना कपूर व पूर्वप्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. अर्पणा वरुडकर यांनी केलेल्या नियोजनाचे कौतुक देखील केले.

या उपक्रमातून निरोगी जीवनशैली नियमित व्यायाम आणि कुटुंबाच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले गेले. यावेळी सर्वांनी निरोगी जीवनाची शपथ घेत आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याचा संकल्प केला. त्याचबरोबर प्रत्येक कुटुंबास एक पदक देऊन त्यांच्या सहभागासाठी त्यांचा गौरव करण्यात आला.

विशेष म्हणजे या उपक्रमामुळे रविवारचा दिवस मोबाईल आणि दैनंदिन धावपळीपासून दूर राहून खेळत, नाचत, हसत योगध्यानात व आनंदाने पालक-विद्यार्थी व शिक्षक यांच्यासोबत वेळ घालविण्याची सुंदर संधी उपलब्ध झाली.

सर्व पालकांनी या कार्यक्रमाचे भरभरून कौतुक करून, खेळू या, निरोगी राहू या व कुटुंबासोबत आनंदी जीवन जगू या या संदेशाने क्रीडा महोत्सवाची सांगता झाली.

आनंददायी शिक्षणातून सर्वांगीण विकास

शिक्षणाचा प्रारंभ हा प्रत्येक बालकाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. इयत्ता पहिली ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक, सामाजिक आणि भावनिक विकासाची पायाभरणी करण्याची इयत्ता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांची जिज्ञासा वाढावी आणि शिकणे आनंददायी व्हावे या उद्देशाने आमच्या शाळेत विविध कृतीप्रधान अध्ययन-अध्यापन उपक्रम प्रभावीपणे राबविले जातात.

हे वर्ष शाळेसाठी अत्यंत महत्त्वाचे वर्ष आहे कारण आपल्या शाळेने हे ज्ञानदानाचे कार्य ५० वर्षांपूर्वी सुरू केले होते. तसेच हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरते कारण, याच वर्षी आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिलीचा नवीन अभ्यासक्रम CBSE नुसार सुरू करत आहोत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे आपले मुख्य ध्येय आहे. याच ध्येयाला अनुसरून, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार 'खेळत-शिका अनुभवातून शिका' या तत्त्वाचा अवलंब करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपली शाळा सातत्याने प्रयत्न करत आहे.



विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षण दिल्यास ते जास्त काळ स्मरणात राहते. या अनुषंगाने इंग्रजी, गणित, मराठी, हिंदी आणि परिसर अभ्यास या विषयांचे अध्यापन विद्यार्थी-केंद्रित पद्धतीने केले जाते. अक्षर व अंकलेखन, शब्दवाचन, चित्रवाचन, गोष्टी सांगणे, काव्य कविता, गणित तत्त्वे, विविध शैक्षणिक खेळ, समूहकार्य, कृतीपत्रिका आणि शैक्षणिक साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांचा अध्ययन प्रक्रियेत सहभाग वाढवून त्यांचे अध्ययन-अध्यापन दृढ केले जाते. प्रशंसा केल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि मूलभूत संकल्पना अधिक प्रभावीपणे रुजू होतात.

भाषिक विकासासाठी कथाकथन, शब्द खेळ उपक्रम राबवले जातात. गणित विषयात वस्तूंच्या साहाय्याने मोजणे, क्रम लावणे, आकृती तुलना आणि विविध तंत्रांनी संकल्पना शैक्षणिक साहित्याच्या वापराने स्पष्ट केल्या जातात. परिसर अभ्यासात निरीक्षण, प्रात्यक्षिक, परिसर भेटींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनाशी निगडित ज्ञान दिले जाते. या विषयांबरोबर चित्रकला, हस्तकला, योग, क्रीडा, संगीत, योग इ. विषयांचीही सराव व योग्य ज्ञान दिले जाते.

आनंददायी, कृतीशील आणि विद्यार्थी केंद्रित अध्ययन – अध्यापन पद्धतीमुळे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी ओढ, सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत असून त्यांच्यात व्यक्तिमत्त्व विकासाची भक्कम पायाभरणी होते.

सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

खेळातून फुलले विद्यार्थी–पालकांचे नाते; शाळेत क्रीडा महोत्सव.

शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विद्यार्थी–पालक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ठाणे येथील व्ही.पी.एम.च्या कॉलेज टर्फवर पार पडलेल्या या महोत्सवात २ ऑक्टोबर २०२६ रोजी माध्यमिक विभागातील, तर ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी सहभाग घेतला. दोन्ही दिवशी सकाळी ७.३० वाजता क्रीडा महोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला.

या क्रीडा महोत्सवाचा मुख्य हेतू होता तो म्हणजे विद्यार्थी आणि पालकांमध्ये निरोगी जीवनशैली, खिलाडूवृत्ती आणि एकोपा जोपासणे आणि कौटुंबिक नात्यांतील वीण अधिक घट्ट करणे. आनंदाने भरलेल्या आणि उत्साहाने उचंबळणाऱ्या वातावरणात विद्यार्थी व पालक एकत्र खेळताना दिसत होते. दहा वेगवेगळ्या क्रीडा केंद्रांवर वयोगटानुसार विविध खेळ आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या खेळांमुळे सहभागींच्या मनात निकोप स्पर्धेची भावना जागी झाली आणि सर्वांना एकत्रितपणे आनंदाचे, हसण्याचे आणि आयुष्यभर लक्षात राहणारे क्षण अनुभवता आले!





क्रीडा–महोत्सवाला व्ही.पी.एम. परिवारातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. यामध्ये व्ही.पी.एम.चे माजी विद्यार्थी व मंडळाचे सदस्य डॉ. महेश बेडेकर, व्ही.पी.एम.च्या विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, माजी अधिष्ठाता श्रीमती कालिंदी कोल्हटकर, प्राथमिक विभागाच्या माध्यमिक विभागाच्या माजी पर्यवेक्षिका व क्रीडा शिक्षिका श्रीमती प्रियांका भांगले, माजी क्रीडा शिक्षक श्री. अशोक आहेर, तसेच माजी विद्यार्थी व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कराटे प्रशिक्षक श्री. अमेय वायंगणकर यांचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमामधील उत्साहात भर पडली.

डॉ. महेश बेडेकर यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. त्यांनी क्रीडा



महोत्सव सुरू झाल्याची घोषणा केली. त्यानंतर पालक आणि विद्यार्थी विविध खेळ खेळण्यात रंगून गेले असे दृश्य.

मैदानावरील उपस्थितांस पाहण्यास मिळाले. विद्यार्थी त्यांना देण्यात आलेली कृती पूर्ण करून आपल्या आई बाबांना ''बाबा, लवकर; आई लवकर'' असे प्रोत्साहन देताना दिसत होते!

एका उपक्रमांतर्गत, आई वडील आणि मूल यांना एकमेकांचे हात धरून क्रीडांगणाला फेरी मारताना पहाणे हा या महोत्सवातील 'हृदय क्षण' होता.

सहभागी विद्यार्थी आणि पालकांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेत क्रीडा महोत्सवाच्या ठिकाणी प्रथमोपचार केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. आनंद बेडेकर आणि त्यांच्या वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली ही व्यवस्था करण्यात आली. गरजेनुसार तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळेच्या वतीने डॉ. आनंद बेडेकर आणि त्यांच्या पथकाचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

क्रीडा महोत्सवाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य आणि उत्तम समन्वय साधल्याबद्दल श्री. यश खुतवड व सौ. सोनाली गांगुर्डे यांचेही शाळेच्यावतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाचे आयोजन सुरळीतपणे पार पडण्यास मदत झाली.

कार्यक्रमाचा समारोप आरोग्यपूर्ण जीवनशैली अंगीकारण्याची शपथ घेऊन करण्यात आला. यावेळी सहभागी प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाने नियमित व्यायाम करणे, योग्य व संतुलित आहार घेणे आणि निरोगी जीवनशैली राखण्याबाबत संकल्प केला. त्यानंतर सर्व सहभागींचा प्रमाणपत्र व पदक देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले म्हणाल्या, ''हा विद्यार्थी-पालक क्रीडा महोत्सव केवळ पदके मिळवण्यापुरता मर्यादित नाही. विद्यार्थी आणि पालकांनी एकत्र येऊन आरोग्य, आनंद आणि एकोप्याचा अनुभव घेणे, हा या उपक्रमाचा खरा उद्देश आहे. गेल्या पाच दशकांपासून खेळ आणि सहभागाची ही भावना आपल्या शाळेच्या वाटचालीचा महत्त्वाचा भाग झाली आहे.''

शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातील हा क्रीडा महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा ठरला. तसेच शाळा, विद्यार्थी आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा हा उपक्रम ठरला. पन्नास वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उत्सव साजरा करताना क्रीडा महोत्सवाने या सोहळ्यात आनंदाची आणि उत्साहाची भर घातली.

सुवर्णमहोत्सवी वर्षात विद्यालयाचा दुहेरी सन्मान!



शाळेला 'सर्वोत्कृष्ट विद्यालय' पुरस्कार; मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांना 'सर्वोत्कृष्ट मुख्याध्यापक' पुरस्कार.

शाळेने आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्षात दुहेरी यश संपादन केले आहे. मुंबईतील नेस्को येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान आयोजित 'एज्युकेशन सप्लाय

अँड फ्रँचायझी एक्सपो २०२६' मध्ये शाळेला 'सर्वोत्कृष्ट शाळा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांना 'सर्वोत्कृष्ट मुख्याध्यापक' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांमुळे संस्थेच्या पाच दशकांच्या शैक्षणिक वाटचालीचा, शिक्षणाप्रती असलेल्या बांधिलकीचा आणि सामूहिक प्रयत्नांचा गौरव झाला आहे.

या दुहेरी सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करताना मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी सुवर्णमहोत्सवी वर्षात शाळेला मिळालेल्या पुरस्काराचे विशेष महत्त्व अधोरेखित केले. वैयक्तिक पुरस्कार आनंद देणारा असला, तरी शाळेला मिळालेला 'सर्वोत्कृष्ट विद्यालय' पुरस्कार हा आपल्यासाठी अभिमानाचा आणि अविस्मरणीय क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या यशामागे मिळालेल्या पाठिंब्याबद्दल डॉ. मोहिले यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, डॉ. महेश बेडेकर, सी.ए. श्री. रसाळ, समितीचे सदस्य, माजी अधिष्ठात्री श्रीमती कोल्हटकर, सहकारी गौरी मोहिले, अंजना कपूर, प्रणाली दुसाने आणि अपर्णा वरुडकर यांच्यासह विविध विभागांतील शिक्षकांचे आभार मानले.

या एक्स्पोमध्ये 'नव्या भारतासाठी शिक्षण : क्षमता, सर्जनशीलता आणि स्पर्धात्मकता' या विषयावर परिसंवादही आयोजित करण्यात आला होता. बदलत्या काळात विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्ये, सर्जनशीलता आणि क्षमता विकसित करण्यासाठी शिक्षणाची भूमिका काय असावी, यावर या परिसंवादात चर्चा करण्यात आली. या संपूर्ण समारंभाचे माध्यम भागीदार 'द टाइम्स ऑफ इंडिया' होते.

पुरस्कार हा केवळ गौरव नसतो; तो पुढील वाटचालीची जबाबदारीही वाढवतो. सुवर्णमहोत्सवी वर्षात मिळालेल्या या दुहेरी सन्मानामुळे सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूलच्या शैक्षणिक प्रवासाला नवी ऊर्जा मिळाली आहे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यात आत्मविश्वास, क्षमता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याच्या शाळेच्या प्रयत्नांना या सन्मानामुळे निश्चितच बळ मिळेल.

जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

१३ जुलै ते १८ जुलै २०२६ – राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि Business Law विभागाच्या वतीने 'कागदी पिशव्यांचे संकलन व वाटप' (Paper Bags Collection Distribution Drive) हा उपक्रम राबविण्यात आला. प्लास्टिकच्या पिशव्यांच्या वापरास पर्याय म्हणून पर्यावरणपूरक कागदी पिशव्यांचा वापर वाढवणे आणि प्लास्टिकच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. स्वयंसेवकांनी स्वतः कागदी पिशव्या तयार करून महाविद्यालय परिसरातील स्थानिक दुकानदारांना व ग्राहकांना वितरित केल्या. या मोहिमेदरम्यान एकूण ६२५ कागदी पिशव्यांचे संकलन आणि वाटप करण्यात आले.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, डॉ. प्रज्ञा राजेबहादूर, डॉ. श्वेता अहिरे आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद चांदवानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

२७ जुलै २०२६ – 'एनईपी अंमलबजावणी सप्ताह' (NEP Celebration Week) अंतर्गत विशेष उद्घाटनाच्या सत्राचे (Inaugural Session) आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. आठवडाभर चालणाऱ्या या उपक्रमाद्वारे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) च्या दृष्टिकोनाचा औपचारिक प्रारंभ करणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. Classroom and Beyond:

Technology, Creativity and Curiosity या विषयावर आधारित या सत्रात प्राध्यापकांना (rote learning) च्या पुढे जाऊन विचार करण्यास प्रेरित करण्यात आले. यात तंत्रज्ञानाचा एक सक्षम साधन म्हणून वापर, कौशल्य म्हणून सर्जनशीलता आणि आजीवन अध्ययनाचा पाया म्हणून उत्सुकता यांचा शिक्षणात समावेश करण्यावर विशेष भर देण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि एनईपी नोडल अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

२८ जुलै २०२६ – 'एनईपी अंमलबजावणी सप्ताह' (NEP Celebration Week) अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी Peer Teaching Activity या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मध्ये भर देण्यात आलेल्या विद्यार्थी–केंद्रित आणि सहकार्यात्मक अध्ययन पद्धतीला (student-centric and collaborative learning approach) प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांना पीअर एज्युकेटर (peer educators) ची भूमिका बजावण्यास प्रोत्साहित करून त्यांच्यातील संकल्पनात्मक स्पष्टता, आत्मविश्वास आणि संवादात्मक कौशल्ये विकसित करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परस्पर अध्ययन, सक्रिय सहभाग आणि नेतृत्वगुणांना वाव मिळून एनईपीच्या दृष्टिकोनानुसार अध्ययन प्रक्रिया अधिक परस्परसंवादी व प्रभावी होण्यास मदत झाली.

तसेच 'एनईपी अंमलबजावणी सप्ताह' (NEP Implementation Week) उपक्रमांतर्गत प्राध्यापकांसाठी NEP Terminology Housie या मनोरंजक खेळ–आधारित उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मधील मुख्य संकल्पना, संज्ञा आणि स्तंभांची माहिती प्राध्यापकांना आनंददायी आणि रंजक पद्धतीने करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या खेळ–पद्धतीद्वारे मूल्यशिक्षण, बहुविद्याशाखीय शिक्षण (multidisciplinary learning) यांसारख्या एनईपीच्या घटकांची माहिती अधिक स्पष्ट झाली. यामुळे प्राध्यापकांमध्ये सक्रिय सहभाग, सहकार्य आणि सकारात्मक संवादाला प्रोत्साहन मिळून वर्गातील अध्यापनामध्ये एनईपी २०२० च्या अंमलबजावणीस मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि एनईपी नोडल अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

३० जुलै २०२६ – 'एनईपी अंमलबजावणी सप्ताह' (NEP Celebration Week) अंतर्गत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी (Non-Teaching Staff) शैक्षणिक आणि प्रशासकीय संज्ञांवर आधारित हाऊसी (Housie based on academic and administrative terminology) या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मधील मुख्य संकल्पना, शैक्षणिक व प्रशासकीय सुधारणा आणि महत्त्वाच्या संज्ञांची माहिती सोप्या, परस्परसंवादी आणि रंजक पद्धतीने करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या खेळ–आधारित उपक्रमामुळे दैनंदिन कामाच्या व्यापातून एक आनंददायी बदल मिळून कर्मचाऱ्यांमध्ये संघभावना, उत्साह आणि एनईपी सप्ताहामध्ये सर्वसमावेशक सहभाग वाढीस लागला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि एनईपी नोडल अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

३० जुलै २०२६ – 'व्होकेशनल कोर्स इन सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजमेंट' (B.Voc) आणि वाणिज्य विभागाच्या वतीने प्रथम वर्षाच्या (FYBVOC) विद्यार्थ्यांसाठी Library Orientation for FYBVOC या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा. नारायण बारसे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन

केले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची कार्यपद्धती, उपलब्ध सुविधा, ग्रंथालयाचे नियम, पुस्तके घेण्या-देण्याची प्रक्रिया, संदर्भ सेवा आणि डिजिटल संसाधनांची माहिती करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित वाचनाची सवय रुजण्यास आणि शैक्षणिक प्रगतीसाठी ग्रंथालयाचा प्रभावी वापर करण्यास प्रोत्साहन मिळाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बी.व्होक समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई आणि उपक्रम प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

३१ जुलै २०२६ - बी.कॉम. इन बिझनेस मॅनेजमेंट (BBM) विभागातर्फे द्वितीय वर्षाच्या (SYBBM) विद्यार्थ्यांसाठी EXIM वर्टिकल अंतर्गत 'रोल प्ले क्टिव्हिटी'चे (Role Play Activity) आयोजन करण्यात आले होते. प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आयात-निर्यात (Export-Import) संकल्पनांचे व्यावहारिक ज्ञान मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांची EXIM दस्तऐवजीकरण, प्रक्रिया आणि व्यापाराच्या विविध टप्प्यांची समज वाढवण्यात आली, तसेच त्यांचे संवाद कौशल्य, संघभावना, समस्या निवारण क्षमता आणि प्रत्यक्ष व्यवहारात सैद्धांतिक ज्ञानाचा वापर करण्याचा आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बीबीएम समन्वयक सहाय्यक प्राध्यापक पूर्वा गायकवाड आणि उपक्रम प्रमुख युक्ता सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

३१ जुलै २०२६ - 'एनईपी अंमलबजावणी सप्ताह' (NEP Celebration Week) अंतर्गत Education and Indian Knowledge System (IKS) या विषयावर आधारित ग्रंथ प्रदर्शनाचे (Book Exhibition) आयोजन करण्यात आले होते. हे प्रदर्शन महाविद्यालयीन ग्रंथालयात पार पडले. भारतातील समृद्ध व वैविध्यपूर्ण ज्ञानपरंपरा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP २०२०) च्या संदर्भातील तिची प्रासंगिकता याबद्दल विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये जनजागृती करणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. या प्रदर्शनाद्वारे उपस्थितांना भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती, साहित्य, विज्ञान, शिक्षण, पारंपरिक ज्ञान आणि देशी पद्धतींशी संबंधित पुस्तके व संसाधने अभ्यासण्याची संधी मिळाली. निवडक पुस्तकांच्या संग्रहाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय, स्व-अध्ययन आणि शैक्षणिक संशोधनाला प्रोत्साहन देण्यात आले. या उपक्रमामुळे भारतीय ज्ञान प्रणालीचे आधुनिक शिक्षणाशी एकत्रीकरण करण्याचे महत्त्व अधोरेखित होऊन विद्यार्थ्यांना भारताच्या बौद्धिक वारशाशी जोडण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि एनईपी नोडल अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन पार पडले.

४ ऑगस्ट २०२६ - बीएमएस (BMS) विभागातर्फे द्वितीय वर्षाच्या (SYBMS - Finance) विद्यार्थ्यांसाठी Entrepreneurship Management या विषयावर 'रोल प्ले क्टिव्हिटी'चे (Role Play Activity) आयोजन करण्यात आले होते. व्यावसायिक नियोजन आणि उद्योजकता व्यवस्थापनाच्या संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वास्तववादी व्यावसायिक परिस्थितींमध्ये सहभागी करून त्यांची विश्लेषणात्मक, संवादात्मक आणि निर्णय घेण्याची कौशल्ये विकसित करण्यात आली, जे राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) च्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बीएमएस समन्वयक डॉ. नितीन पागी आणि उपक्रम प्रमुख युक्ता सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

८ ऑगस्ट २०२६ - 'व्होकेशनल कोर्स इन सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजमेंट' विभागाच्या वतीने प्रथम वर्षाच्या

(FY B.Voc) विद्यार्थ्यांसाठी 'क्वांटिटेटिव्ह मेथड्स – १' या विषयावर एका ऑनलाईन क्विझचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या विषयातील आकलनाची चाचणी घेणे आणि त्यांना शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करणे हा या क्विझचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बी.व्होक समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई आणि उपक्रम प्रमुख सुश्री हृतिका निमणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

१२ ऑगस्ट २०२६ – DLLE विभाग, Business Law व बीएएमएमसी (BAMMC) विभागातर्फे आयक्यूएसीच्या (IQAC) पुढाकाराने 'Influence of AI on Copyright and Trademark' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ॲड. समता जोशी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence) बौद्धिक संपदा अधिकारांवर (Intellectual Property Rights), विशेषतः कॉपीराइट आणि ट्रेडमार्कवर होणाऱ्या परिणामांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. या सत्रात विद्यार्थ्यांनी एआय आणि बौद्धिक संपदेशी संबंधित कायदेशीर व नैतिक बाबी समजून घेतल्या आणि आपल्या शैक्षणिक व सर्जनशील कामात एआयचा जबाबदारीने वापर करण्याचे धडे घेतले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, डीएलएलई अध्यक्षा डॉ. संगीता मोहंती, आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रज्ञा राजेबहादूर आणि शिक्षक प्रमुख वेदावती चिपळूणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.

१४ ऑगस्ट २०२६ – DLLE विभागाच्या वतीने 'स्वच्छता मोहीम' (Cleanliness Drive) आयोजित करण्यात आली होती. ही मोहीम महाविद्यालय परिसर आणि महाविद्यालयाजवळील सिडको परिसरात पार पडली. डॉ. संगीता मोहंती यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याचे महत्त्व पटवून देणे, तसेच महाविद्यालय परिसर व आसपासचा भाग स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, संघभावना आणि सामाजिक सहभागाची जाणीव निर्माण झाली. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि शिक्षक प्रमुख डॉ. संगीता मोहंती यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

१४ ऑगस्ट २०२६ – 'फायनान्शियल मार्केट्स' (BFM) विभागातर्फे प्रथम वर्षाच्या (FYBFM) विद्यार्थ्यांसाठी Ecosystem Observation या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवतालच्या परिसराचे निरीक्षण करून विविध जैविक आणि अजैविक घटकांची ओळख पटवली. सजीव आणि त्यांच्या पर्यावरणातील परस्पर-संबंधांचा अभ्यास करून परिसंस्थेची रचना आणि तिचे कार्य व्यावहारिकरीत्या समजून घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि उपप्राचार्या तथा बीएफएम समन्वयक डॉ. मृण्मयी थत्ते यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

१४, १५ ऑगस्ट २०२६ – राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत १४ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालय परिसरात 'तिरंगा रॅली' (Rally On Tiranga) आणि १५ ऑगस्ट २०२६ रोजी 'स्वातंत्र्यदिन सोहळा' (Independence Day Celebration) उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रीय अभिमान, एकता आणि जबाबदारीची भावना रुजवणे, तसेच स्वातंत्र्य-सैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, कार्यक्रम अधिकारी डॉ. श्वेता अहिरे, डॉ. विनोद चांदवानी आणि शिक्षक प्रमुख श्री. रूपेश महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

३ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२६ – राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने 'सोबती फाऊंडेशन' आणि 'श्री साईनाथ क्टिव्हिटी सेंटर' यांच्या सहकार्याने 'बंधन सेवा का, उत्सव भाईचारे का' या उपक्रमांतर्गत राखी विक्री मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. दिव्यांग मुलांच्या कलागुणांना, कौशल्यांना आणि आत्मविश्वासाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. मुलांनी स्वतः तयार केलेल्या हस्तनिर्मित राख्यांचे प्रदर्शन व विक्री करून त्यांच्यातील सर्जनशीलता, स्वावलंबन आणि सामाजिक सहभागाची भावना वाढीस लावण्यात आली. या उपक्रमात एकूण ३१८ राख्यांची यशस्वी विक्री झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, कार्यक्रम अधिकारी डॉ. श्वेता अहिरे, डॉ. विनोद चांदवानी आणि शिक्षक प्रमुख श्री. रूपेश महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

१३ ऑगस्ट २०२६ – १५० Years of Vande Mataram समितीच्या वतीने Vande Mataram - 150 Years of Glory या विषयावर पोस्टर बनवण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'वंदे मातरम'चे ऐतिहासिक महत्त्व आणि भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील त्याचे योगदान याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी Vande Mataram - 150 Years of Glory, Vande Mataram and Freedom Struggle आणि Vande Mataram - Focus on Any One Stanza या विषयांवर आधारित आकर्षक पोस्टर्स तयार केले. डॉ. प्रकाश जंगले यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेत प्रथम क्रमांक अंशिका चौधरी (FY BAF), द्वितीय क्रमांक केतली ठाकूर (TY BAF) आणि तृतीय क्रमांक ईव्हा जोसेफ अल्फोन्सो (SY BAF) यांनी पटकावला; तर रोशनी पुजारी (FY BAF) व रीत प्रेमचंदानी (FY BAF) यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि समन्वयक डॉ. अनिल ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

२९ ऑगस्ट २०२६ – बी.कॉम. (अकाउंटिंग अँड फायनान्स) विभागाच्या वतीने 'फायनान्शियल प्लॅनिंग अकॅडमी' च्या सहकार्याने द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'Level Up Your Career: Skills That Industry Wants' या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी श्री. सोहम जोशी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कॉर्पोरेट जगताच्या बदलत्या अपेक्षा, तांत्रिक, डिजिटल, संवादात्मक व विश्लेषणात्मक कौशल्यांचे महत्त्व समजावून सांगून शैक्षणिक अभ्यास व व्यावसायिक गरजांमधील अंतर दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा या व्याख्यानाचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बीएएफ समन्वयक डॉ. नीलम शेख आणि शिक्षक प्रमुख डॉ. शेफाली कोंडेवार व डॉ. विनोद चांदवानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२६ – बीएमएस (BMS) विभागाच्या 'MPCOE वेळणेश्वर अभ्यासदौरा समिती'च्या वतीने विद्यार्थ्यांसाठी व्ही.पी.एम. च्या 'महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग' (वेळणेश्वर), गुहागर, गणपतीपुळे आणि आसपासच्या परिसराचा विशेष

अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. वर्गखोलीच्या पलीकडे जाऊन प्रात्यक्षिक अनुभवातून शिकण्याची संधी देणे हा या अभ्यासदौऱ्याचा मुख्य उद्देश होता. या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना कोकण किनारपट्टीच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आर्थिक महत्त्वाचे ज्ञान मिळाले, तसेच नैसर्गिक वातावरणात स्थानिक परंपरा, उद्योजकता, समुदाय जीवन आणि पर्यावरण जागरूकतेचा अभ्यास करता आला. शिक्षणासोबतच पर्यटनाची सांगड घालून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, सामाजिक संवाद आणि सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, अभ्यासदौरा समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल ढवळे आणि उपक्रम प्रमुख डॉ. मुग्धा बापट यांच्या मार्गदर्शनाखाली हा दौरा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

१ सप्टेंबर २०२६ – अर्थशास्त्र विभागाच्या वतीने Career-O-Nomics या 'इकॉनॉमिक्स क्लब'चे भव्य उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र आणि संबंधित क्षेत्रांतील करिअरच्या संधी शोधण्यासाठी एक मंच उपलब्ध करून देणे हा या क्लबच्या स्थापनेचा मुख्य उद्देश आहे. या क्लबद्वारे विद्यार्थ्यांची चालू आर्थिक घडामोडींबद्दलची समज वाढवणे, त्यांची विश्लेषणात्मक, संशोधन, संवाद आणि निर्णयक्षमता विकसित करणे तसेच वर्गातील अभ्यासाची प्रत्यक्ष व्यवहाराशी सांगड घालणे हे साध्य केले जाणार आहे. आगामी काळात व्याख्याने, चर्चा, स्पर्धा, कार्यशाळा आणि करिअर-केंद्रित उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून उच्च शिक्षण, रोजगार व उद्योजकतेसाठी तयार केले जाईल. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख व उपक्रम प्रमुख प्रा. कल्पना नायर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला.

३ व ४ सप्टेंबर २०२६ – एनईपी सेलच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि DLLE विभागाच्या सहकार्याने 'इन्स्टिट्यूशनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' (ISR) अंतर्गत Community Engagement Programme राबविण्यात आला. 'वी नीड यु फाऊंडेशन' च्या सहयोगाने 'सरस्वती विद्या मंदिर' येथे 'Workshop on Teaching Aid under ISR' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सुश्री रती भोसेकर आणि श्री. अभय कांता यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, सहअनुभूती, नेतृत्वगुण, संघभावना आणि नागरी उत्तरदायित्वाची भावना वाढीस लावणे, तसेच वर्गातील अध्ययन आणि प्रत्यक्ष समाजकार्याचा अनुभव यांमधील अंतर दूर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, एनईपी नोडल अधिकारी प्रा. अर्चना डोईफोडे व डॉ. मृण्मयी थत्ते आणि शिक्षक प्रमुख डॉ. विनोद चांदवानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

५ सप्टेंबर २०२६ – इंग्रजी विभागातर्फे 'शिक्षक दिन' साजरा करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांबद्दल आदर व कृतज्ञता व्यक्त करणे, तसेच त्यांच्या मोलाच्या योगदानाचा गौरव करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमादरम्यान विविध संवादी उपक्रम व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील आपुलकी, आदर व सकारात्मक संवाद दृढ करण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, विभागप्रमुख डॉ. प्रमोद खराटे आणि उपक्रम प्रमुख सहाय्यक प्राध्यापक अल्विन काव्हालो यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

२४ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०२६ – 'संशोधन व विकास सेल' (RD Cell) आणि 'आयक्यूएसी'

(IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने पीएचडी संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी Ph.D. Coursework / Faculty Development Programme (FDP) of 6 Credits: Research Methodology Research Ethics Course 2026-27 या ९० तासांच्या (६ क्रेडिट्स) विशेष अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ ते शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ दरम्यान ऑनलाइन पद्धतीने पार पडला. या अभ्यासक्रमात ४ क्रेडिट्स 'रिसर्च मेथोडॉलॉजी' (Research Methodology) आणि २ क्रेडिट्स 'रिसर्च एथिक्स' (Research Ethics) विषयासाठी देण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. सिबिल थॉमस, डॉ. राकेश नाम्बियार, प्रा. डॉ. किन्नरी ठक्कर, डॉ. कांचना महादेवन, डॉ. सुषमा चंद्रकुमार पोवदवाल, डॉ. संतोष हुलगाबळी, डॉ. रश्मी अग्निहोत्री, डॉ. शिवानी नाईक, डॉ. हरविंद जुगलकिशोर भसीन, डॉ. अतुल कहाते, डॉ. नंदकिशोर रामराव मोटेवार, डॉ. सुचित्रा अ. नाईक, डॉ. अनुषा रामनाथन, डॉ. गोपाकुमार व्ही., डॉ. पूनम एन. कक्कर, डॉ. अभिषेक एन., डॉ. मुप्पावरम गौरी शंकर, डॉ. शामप्रसाद पुजार, श्री. अजय सराफ, डॉ. केयुरकुमार नायक आणि डॉ. राजेश भोईटे यांनी प्रमुख विषयतज्ज्ञ व मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. सहभागींना संशोधन प्रक्रिया, संशोधन आराखडा, माहिती संकलन, विश्लेषण, एआय टूल्स (AI tools), शैक्षणिक डेटाबेस, प्लेजिअरिझम (plagiarism), बौद्धिक संपदा अधिकार (IPR) आणि संशोधनातील नैतिक मूल्ये यांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे सहभागींची पद्धतशीर, नैतिक आणि दर्जेदार संशोधन करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत झाली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स यशस्वीरीत्या पार पडला.

२९ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२६ – बीबीए (लॉजिस्टिक्स) विभागाच्या वतीने 'इंट्रानोव्हा ट्रेड अँड ट्रेनिंग एलएलपी' (INTRANOVA TRADE AND TRAINING LLP) च्या सहकार्याने द्वितीय व तृतीय वर्षाच्या (SYBBA, TYBBAd SYBMS) विद्यार्थ्यांसाठी Value Added Course on Supply Chain Analytics या ३० तासांच्या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले होते. या प्रसंगी श्री. नरेश जोशी, श्री. नागेश देवकाते आणि श्री. सिद्धार्थ क्षीरसागर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना पुरवठा साखळी विश्लेषणामधील (Supply Chain Analytics) व्यावहारिक आणि उद्योग-सुसंगत ज्ञान व कौशल्ये प्रदान करणे हा या कोर्सचा मुख्य उद्देश होता. या अभ्यासक्रमादरम्यान पुरवठा साखळी व्यवस्थापन संकल्पना, डिस्क्रिप्टिव्ह, प्रेडिक्टिव्ह व प्रिस्क्रिप्टिव्ह नालिटिक्स, एक्सेल, पॉवर बीआय (Power BI), डेटा क्लीनिंग, डॅशबोर्ड्स, सीपीएम/केपीआय (KPIS), केस स्टडीज, व्हिज्युअल स्टोरीटेलिंग आणि मिनी-प्रोजेक्ट्स या विषयांचा सखोल समावेश करण्यात आला होता.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, समन्वयक डॉ. अर्चना नायर आणि शिक्षक प्रमुख सहाय्यक प्राध्यापक नी रुप्ला यांच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स यशस्वीरीत्या पार पडला.

९ सप्टेंबर २०२६ – बीबीए (लॉजिस्टिक्स) विभागातर्फे प्रथम वर्षाच्या (FYBBA) विद्यार्थ्यांसाठी NEP Sensitisation for FYBBA Students या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी एनईपी नोडल अधिकारी डॉ. मृण्मयी थत्ते यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची (NEP) मुख्य वैशिष्ट्ये आणि उद्दिष्टे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. एनईपीद्वारे

प्रोत्साहित करण्यात आलेला सर्वांगीण, लवचिक आणि बहुविद्याशाखीय (holistic, flexible, and multidisciplinary) दृष्टिकोन, तसेच उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासावरील त्याचे परिणाम याबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, विभागप्रमुख/समन्वयक डॉ. अर्चना नायर आणि उपक्रम प्रमुख सहाय्यक प्राध्यापक नी रुप्ला यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

९ सप्टेंबर २०२६ – बँकिंग अँड इन्शुरन्स (BBI) विभागाच्या वतीने 'BI Nexus: Banking Insurance Club'चे उद्घाटन आणि द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'इन्व्हेस्टमेंट बँकिंग' या विषयावर मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी टलास स्किल टेक युनिव्हर्सिटीचे (ATLAS Skill Tech University) डॉ. (सीए) सिद्धेश वायकर हे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते 'BI Nexus' क्लबचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले, ज्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना इन्व्हेस्टमेंट बँकिंगवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अपेक्षा यांमधील अंतर दूर करणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या तथा बीबीआय समन्वयक डॉ. मृण्मयी थत्ते आणि शिक्षक प्रमुख समिधा परब व डॉ. झरना तोलानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

१० सप्टेंबर २०२६ – 'मराठी भाषा आणि साहित्य' विभागातर्फे परिषदपूर्व उपक्रम म्हणून अनुभव ते अभिव्यक्ती: कविता लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी श्री. रोहन टिल्लू (कवी, पत्रकार) आणि सौ. कल्पना सांगळे (कवयित्री, लेखिका) यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात रोहन टिल्लू यांनी 'अनुभवातून कवितेकडे: कवितेची निर्मितीप्रक्रिया' या विषयावर, दुसऱ्या सत्रात सौ. कल्पना सांगळे यांनी 'कवितेची भाषा व अभिव्यक्ती' या विषयावर, तर अंतिम सत्रात 'कविता लेखन ते सादरीकरण' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेची ओळख करून देणे आणि अनुभवातून अभिव्यक्तीकडे जाणाऱ्या त्यांच्या सर्जनशील लेखन कौशल्याचा विकास करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, विभागप्रमुख डॉ. संतोष राणे आणि उपक्रम समन्वयक प्रा. रूपेश महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.

१० सप्टेंबर २०२६ – बी.कॉम. इन अकाउंटिंग अँड फायनान्स (BAF) विभागाच्या वतीने तृतीय वर्षाच्या (TYBAF) विद्यार्थ्यांसाठी Model Exhibition on 'Vedic Wealth Management: Dharma, Artha and Prosperity' या प्रतिकृती प्रदर्शनाचे (Model Exhibition) आयोजन करण्यात आले होते. भारतीय ज्ञान प्रणालीतील (Indian Knowledge Systems) संकल्पनांची आधुनिक आर्थिक तत्त्वांशी सांगड घालून संपत्ती व्यवस्थापन हे केवळ पैसे मिळवणे किंवा वाचवणे नसून नैतिक निर्णयप्रक्रिया, जबाबदार साधनसंपत्ती व्यवस्थापन, सामाजिक कल्याण आणि शाश्वत समृद्धीशी संबंधित आहे हे समजून घेणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये अनुभवातून शिकणे, सर्जनशीलता, गंभीर विचार क्षमता आणि ज्ञान संवादास प्रोत्साहन मिळाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बीएएफ विभागप्रमुख डॉ. नीलम शेख आणि शिक्षक प्रमुख डॉ. विनोद चांदवानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

११ सप्टेंबर २०२६ – करिअर गायडन्स अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी TCS Placement Drive चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सुश्री दीपिका माने आणि श्री. कृष्णा यांनी टीसीएस (TCS) चे प्रतिनिधी व मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना टीसीएसच्या नोकरभरती प्रक्रियेत (recruitment process) सहभागी होण्याची थेट संधी उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या अंतर्गत टीसीएसच्या भरती टीमसोबत संवाद साधण्याची आणि निवड प्रक्रियेच्या विविध टप्प्यांतून जाण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा समजून घेण्यास आणि कॅम्पस प्लेसमेंटच्या संधींचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि प्लेसमेंट सेलच्या अध्यक्षा डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

११ सप्टेंबर २०२६ – संस्कृत विभागाच्या वतीने 'नवरस' या संकल्पनेवर आधारित 'संस्कृत दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. सुचित्रा ताजणे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. नऊ मूळ भावनांच्या (नवरस – शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत आणि शांत) माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कृत साहित्य, भाषा आणि भारतीय सौंदर्यशास्त्राची ओळख करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रसंगी सादरीकरण आणि चित्रणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी संस्कृत साहित्य, काव्य व नाटकामधून विविध भावना कशा व्यक्त केल्या जातात याचा अभ्यास केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, आत्मविश्वास, अभिव्यक्ती व संवादात्मक कौशल्ये विकसित होण्यास आणि भारतीय 'रस सिद्धान्ता'चे महत्त्व समजण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि संस्कृत विभाग प्रमुख तथा सहाय्यक प्राध्यापक स्वाती भालेराव व सहाय्यक प्राध्यापक रोहिणी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

१२ सप्टेंबर २०२६ – राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) वतीने स्वयंसेवकांसाठी Session on Disaster Management (आपत्ती व्यवस्थापन सत्र) अंतर्गत Disaster Preparedness, Emergency Response CPR Training या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम महाविद्यालयीन प्रांगणात (College Campus) पार पडला. या प्रसंगी सुश्री नम्रता करंडे आणि श्री. रोहित कोंढालेकर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना प्रशिक्षण दिले. आपत्कालीन परिस्थितीत स्वयंसेवकांना आपत्तीची पूर्वतयारी, आपत्कालीन प्रतिसाद, सुरक्षा उपाय आणि आपत्तीच्या वेळी स्वयंसेवकांची भूमिका याबद्दल जागरूक करणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमामुळे स्वयंसेवकांना आपत्कालीन परिस्थितीत शांततेने व जबाबदारीने कार्य करण्यासाठी आवश्यक मूलभूत ज्ञान, प्रथमोपचार, सीपीआर (CPR) प्रशिक्षण, सुरक्षित बाहेर पडण्याच्या पद्धती (Evacuation Procedures) आणि प्रभावी संवादाचे कौशल्य आत्मसात करण्यास मदत झाली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, कार्यक्रम अधिकारी डॉ. श्वेता अहिरे व डॉ. विनोद चांदवानी आणि शिक्षक प्रमुख इप्सिता दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

२८ सप्टेंबर २०२६ – ISR अंतर्गत 'एनईपी सेल' (NEP Cell) द्वारे 'राष्ट्रीय सेवा योजना' (NSS) आणि DLLE यांच्या संयुक्त विद्यमाने व 'वी नीड यू फाऊंडेशन' (We Need You Foundation) च्या सहकार्याने Community Engagement Programme - Workshop on Teaching Aid Preparation या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा महाविद्यालयीन प्रांगणात पार पडली. या प्रसंगी श्रीमती

ज्योती बर्वे आणि कोमल मौर्य यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. शैक्षणिक उद्देशांसाठी नावीन्यपूर्ण व प्रभावी अध्यापन साधने (Teaching aids) तयार करणे आणि त्यांचा वापर करण्याचे व्यावहारिक कौशल्य स्वयंसेवकांमध्ये विकसित करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमात कमी खर्चात व स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधनांचा वापर करून अनुभवात्मक, कृती-आधारित आणि विद्यार्थी-केंद्रित अध्यापनास प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, संघभावना, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण आणि वर्ग व्यवस्थापन कौशल्ये वाढीस लागून समुदाय विकास व गुणवत्तेच्या शिक्षणात योगदान देण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, एनईपी नोडल अधिकारी प्रा. अर्चना दोईफोडे व डॉ. मृण्मयी थत्ते आणि शिक्षक प्रमुख डॉ. विनोद चांदवानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

२८ सप्टेंबर २०२६ – बी.कॉम. व एम.कॉम. (अकाउंटिंग अँड फायनान्स) विभागाच्या (BAF MAF) वतीने FINCREW या विभागीय क्लबचा अधिकृत उद्घाटन सोहळा पार पडला. या प्रसंगी रियाना बास्तोस (Ms. Aariana Bastos - Manager, Placement and LD, FP- Edutech) यांनी प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता, नेतृत्वगुण, नवसंशोधन , संघभावना आणि व्यावसायिक विकास या मूल्यांना प्रोत्साहन देणे व क्लबच्या उद्दिष्टांची ओळख करून देणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि विभागप्रमुख डॉ. नीलम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

२८ सप्टेंबर २०२६ – बी.कॉम. व एम.कॉम. (अकाउंटिंग अँड फायनान्स) विभागाच्यावतीने 'फायनान्शियल प्लॅनिंग अकॅडमी' (FP- Edutech) च्या सहकार्याने Smart Payroll: Coding Compliance into Modern Software या विषयावर अर्ध्या दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी रियाना बास्तोस – (Manager, Placement and LD, FP- Edutech) यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना आधुनिक पेरोल प्रणाली, वैधानिक अनुपालन (statutory compliance), वेतन प्रक्रिया (salary processing), कर अनुपालन (tax compliance), पेरोल रिपोर्टिंग आणि पेरोल व्यवस्थापनातील तंत्रज्ञानाची भूमिका याबाबत व्यावहारिक व उद्योग-भिमुख ज्ञान देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अकाउंटिंग व फायनान्स क्षेत्रातील सैद्धांतिक ज्ञानाची प्रत्यक्ष उद्योग पद्धतींशी सांगड घालण्यास आणि भविष्यातील करिअरच्या संधींसाठी आवश्यक व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि विभागप्रमुख डॉ. नीलम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.

३० सप्टेंबर २०२६ – महाविद्यालयाच्या अकाउंटन्सी विभागातर्फे 'रोटरी क्लब ऑफ ठाणे सिटी' यांच्या सहकार्याने Cybersecurity - Securing today's Digital World या महत्त्वाच्या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सकाळी ९:३० वाजता 'कात्यायन' सभागृहात पार पडला. या प्रसंगी महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक (DGP) तसेच मुंबई, ठाणे व नागपूरचे माजी पोलीस आयुक्त श्री. धनुषकोडी शिवानंदन (आयपीएस) यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना संबोधित केले. Stay Aware & Stay Safe & Stay Secure या मुख्य संकल्पनेवर (Central Theme) आधारित असलेल्या

या सत्रात २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या व्याख्यानाद्वारे विद्यार्थी व प्राध्यापकांना डिजिटल सुरक्षा, नवीन ऑनलाईन धोके आणि वैयक्तिक माहितीच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना डिजिटल सुरक्षेबाबत जागरूक करून एक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी प्रेरित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कनिष्ठ महाविद्यालय

४ सप्टेंबर २०२६ – 'अतुल्यसेल' कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'करिअर मार्गदर्शन' सत्र आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शन वर्गाच्या वक्त्या सौ. गौरी झोपे होत्या. विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले.

५ सप्टेंबर २०२६ – इयत्ता ११ वी चा विद्यार्थी सेन गुप्ता ह्यास आंतर महाविद्यालयीन पेंटिंग स्पर्धेत, (मॉडेल महाविद्यालय डोंबिवली) प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

९ सप्टेंबर २०२६ – 'युवाशिल्प' च्या वतीने कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'ग्रंथालय भेट' चे आयोजन करण्यात आले होते. जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास भेट दिली. ग्रंथालयाचा संदर्भ विभाग, पुस्तक देव घेव विभाग, संशोधन विभाग, वर्तमानपत्र वाचन विभाग, अभ्यासिका ह्या सर्व विभागांची उत्तम माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. ग्रंथपाल श्री. बारसे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. राधिका पारसनीस-गुप्ते यांनी 'ग्रंथालय भेट' हा उपक्रम आयोजित केला होता. विद्यार्थ्यांनी आनंद घेतला.

१२ सप्टेंबर २०२६ – अर्थशास्त्र विभागातर्फे बँकींग क्षेत्रातील सादरीकरण आयोजित केले होते. अर्थशास्त्रातील प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले. सौ. माधवी परदेशी, सौ. सोनल केणी, सौ. मनिषा ठाकूर ह्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले.

१२ सप्टेंबर २०२६ – ठाणे महानगर पालिकेच्या वतीने वैद्यकीय शिबिराचे आयोजन केले होते. या दिवशी विद्यार्थ्यांना 'गवर्नर' हा चित्रपट दाखविण्यात आला.

३० सप्टेंबर २०२६ – 'युवाशिल्प' व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने आयोजित केली होती. श्री. रूपेश महाडिक सर यांनी 'वाचनाचे महत्त्व' व डॉ. संतोष राणे सर यांनी 'लिखाणाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले. 'पुस्तक आपल्या भेटीला' या विषयाअंतर्गत विविध विषयावरच्या विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे वाचन केले. पुस्तक परीक्षण सादर केले. स्पर्धेच्या विजेच्या विद्यार्थ्यांना व पुस्तक वाचन घोषवाक्य विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, पुस्तके, व पेन देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांचे कौतुक केले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके बक्षीस रुपात दिले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. राधिका पारसनीस-गुप्ते यांनी केले होते.

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

विद्यापीठस्तरीय जलतरण स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची उल्लेखनीय कामगिरी

मुंबई विद्यापीठाच्या जलतरण स्पर्धेत विधी महाविद्यालयातील प्रथम वर्ष एलएल. एम (LL.M.) चा विद्यार्थी श्री शुभम होळ याने उल्लेखनीय कामगिरी करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत त्याने ८०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण प्रकारात सुवर्णपदक आणि ८०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण प्रकारात रौप्यपदक पटकावले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीतून त्याची मेहनत, जिद्द, समर्पण आणि क्रीडानैपुण्य दिसून येते. विद्यापीठस्तरावर मिळवलेल्या

या यशामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला आहे. महाविद्यालयाच्या वतीने श्री शुभम होळ यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी आणि उज्ज्वल क्रीडा कारकिर्दीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत.



बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) यांच्या सोशल मीडिया वापराबाबतच्या निर्देशांच्या अनुपालन

बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) यांच्या सोशल मीडिया वापर, डिजिटल नैतिकता व व्यावसायिक आचारसंहितेबाबतच्या निर्देशांनुसार महाविद्यालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात आली आहे :

१. BCI च्या निर्देशांबाबत सूचना फलकावर सूचना प्रसिद्ध करण्यात आली.

२. डिजिटल नैतिकता, गोपनीयता व जबाबदार सोशल मीडिया वापराबाबत जागरूक करण्यात आले.

३. विद्यार्थ्यांना जबाबदार सोशल मीडिया वापर, महाविद्यालयाची प्रतिष्ठा, गोपनीयता व व्यावसायिक आचारसंहितेबाबत जागरूक करण्यात आले.

४. BCI निर्देशांनुसार आवश्यक Annexure-B Form विद्यार्थ्यांकडून भरून घेऊन त्याची नोंद ठेवण्यात आली.

५. संबंधित सूचना, जागृतीपर उपक्रम व Annexure-B Forms यांचे आवश्यक दस्तऐवजीकरण व अभिलेख जतन करण्यात आले आहेत.

वरील सर्व कार्यवाही मा. प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार व मा. उपप्राचार्य डॉ. विनोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कार्यवाहीस सहाय्यक प्राध्यापक श्री. शिवाजी बिबे यांनी सहकार्य केले.

अनधिकृत मंडप व ध्वनी प्रदूषणाबाबत महाविद्यालयात चर्चासत्र :

९ सप्टेंबर २०२६ : महाविद्यालयात 'अनधिकृत मंडप आणि ध्वनी प्रदूषण' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणेचे सचिव श्री. रवींद्र पाजनकर यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

उद्घाटनपर भाषणात श्री. पाजनकर यांनी संविधानाने नागरिकांना दिलेल्या विविध मूलभूत अधिकारांचा उल्लेख करत 'शांततेचा अधिकार' या महत्त्वपूर्ण विषयावर भाष्य केले. स्वतःला वाटणारा आनंद जेव्हा दुसऱ्याच्या शांततेचा भंग करतो, तेव्हा आपला आनंद कायद्याच्या चौकटीत बसणारा नाही, हे समजून घेतले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

या चर्चासत्रात डॉ. महेश बेडेकर यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्देशांवर चर्चा करण्यात आली. डॉ. महेश बेडेकर यांनी जनहित याचिका दाखल करण्यामागील कारणे, तसेच तिचा प्रवास उपस्थितांसमोर मांडला. डीजे किंवा लाउडस्पीकरला विरोध करणे अथवा सार्वजनिक रस्त्यावर नियमबाह्य पद्धतीने मंडप उभारण्यास विरोध केला की, त्याचे उत्तर देण्याऐवजी काही जण असंबंधित मुद्दे उपस्थित करून वितर्क मांडतात. मी उत्सवप्रिय व्यक्ती आहे; मात्र माझ्या उत्सवामुळे इतरांना त्रास होऊ नये, ही माझी जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. जनहित याचिकेतून समोर आलेले न्यायालयीन निर्देश कठोरपणे अंमलात आणले जावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

ठाणे नगर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक श्रीमती द्वारका डोखे यांनी पोलीस कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सदैव तत्पर असतात. मात्र, एकाच विषयावर दोन गटांच्या परस्परविरोधी भूमिका असतील, तर कायद्यानुसार निर्णय घ्यावा लागतो, असे सांगितले. नागरिकांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण होणे आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख श्री. यासिन तडवी यांनी आपत्ती उद्भवू नये यासाठी महानगरपालिका करीत असलेल्या उपाययोजना तसेच आपत्ती उद्भवल्यास करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. जनहित याचिकेच्या माध्यमातून महानगरपालिकेला देण्यात आलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करून उत्सव शांततापूर्ण पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य तथा विधी कक्षाचे प्रभारी डॉ. विनोद एच. वाघ यांनी केले. लाउडस्पीकर लावू नये यासाठी अनेक कारणे दिली जातात; मात्र लाउडस्पीकर लावलाच पाहिजे, उत्सवासाठी त्याची गरज आहे किंवा त्याशिवाय उत्सव होऊ शकत नाही, असा एकही ठोस तर्क दिला जात नाही, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी केला. विधी सहाय्य कक्षामार्फत १९७५ पासून विविध कायदेविषयक व जनजागृतीपर कार्यक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. कायद्याचे पालन करूनच उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रम साजरे करण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांनी चर्चासत्राचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रेरणा वसावे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. चंदणी घोगरे यांनी केले. चर्चासत्राला विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयात १३/०९/२०२६ रोजी केंद्रीय लोकसेवा आयोग राष्ट्रीय संरक्षण अकादमी आणि नौदल अकादमी – संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (२) घेण्यात आली तसेच २८८ उमेदवार परीक्षेसाठी उपस्थित होते

नववे मुख्य न्यायमूर्ती एम. सी. छगला स्मृती व्याख्यान

मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागातर्फे दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई येथील के. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात नववे मुख्य न्यायमूर्ती एम. सी. छगला स्मृती व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात भारताचे माजी सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांनी 'मानवी हक्क आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि महाविद्यालयातील ११ विद्यार्थी उपस्थित होते. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांबाबत मौल्यवान माहिती व मार्गदर्शन प्राप्त झाले.



ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या सहकार्याने आणि अक्षय्य स्वस्ती फाऊंडेशनच्या सहकार्याने गणेश विसर्जन निमित्त पर्यावरण संवर्धन जनजागृती उपक्रम

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील महानगरपालिकेने निश्चित केलेल्या व मार्गदर्शक सूचनांनुसार निर्धारित गणेश विसर्जन स्थळांवर. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण धार्मिक व सांस्कृतिक उत्सव असून, तो मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरा केला जातो.

तथापि, गणेशमूर्तींचे विसर्जन, सजावटीसाठी वापरण्यात येणारे साहित्य, रासायनिक रंग तसेच निर्माल्य व इतर कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट यामुळे जलस्रोत आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर विद्या प्रसारक मंडळाचे, ठाणे विधी महाविद्यालय DLLE अंतर्गत, ठाणे महानगरपालिका आणि अक्षय्य स्वस्ती फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गणेश विसर्जनाच्या कालावधीत पर्यावरण संवर्धन व जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक गणेश विसर्जन, जलस्रोतांचे संरक्षण, स्वच्छता, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती:

१. नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाबाबत जनजागृती करणे.

२. गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे.

३. नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याबाबत जागरूकता निर्माण करणे.

४. जलस्रोतांना हानी पोहोचविणाऱ्या रासायनिक रंग व घातक पदार्थांचा वापर टाळण्याचा संदेश देणे.

५. नद्या, तलाव, खाडी व इतर जलस्रोतांचे प्रदूषणा-पासून संरक्षण करण्याबाबत जनजागृती करणे.

६. गणेशोत्सवाच्या काळात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यास प्रोत्साहन देणे.

७. नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाची सामाजिक जबाबदारी निर्माण करणे.

८. विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाच्या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे.

९. ठाणे शहर अधिक स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक बनविण्याच्या प्रयत्नांना सहकार्य करणे.

पर्यावरण संवर्धनाचे प्रमुख संदेश

उपक्रमादरम्यान नागरिकांना पुढील पर्यावरणपूरक संदेश देण्यात आले:

- शाडू मातीच्या व पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा.
- गणेशमूर्तींवर रासायनिक रंगांचा वापर टाळावा.
- सजावटीसाठी नैसर्गिक व जैवविघटनशील साहित्याचा वापर करावा.
- जलस्रोतांमध्ये कोणत्याही प्रकारचा कचरा किंवा प्लास्टिक टाकू नये.
- गणेशमूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेने निश्चित केलेल्या विसर्जन स्थळीच करावे.
- निर्माल्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी.
- विसर्जन स्थळे व परिसर स्वच्छ ठेवावा.
- गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरण संरक्षणालाही प्राधान्य द्यावे.

कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेले उपक्रम

गणेश विसर्जनाच्या विविध दिवशी निर्धारित विसर्जन स्थळांवर नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. नागरिकांना गणेश विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणारे संभाव्य परिणाम, प्लास्टिक व निर्माल्य व्यवस्थापन, पर्यावरणपूरक मूर्ती आणि स्वच्छतेचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली.

उपक्रमाद्वारे पुढील संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला:

निसर्गाची पूजा... स्वच्छ भविष्यासाठी आजचा संकल्प! तसेच,

स्वच्छ पर्यावरण – समृद्ध समाज – हाच खरा बाप्पाला मान!

हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

विद्यार्थी व स्वयंसेवकांची भूमिका

DLLE अंतर्गत सहभागी विद्यार्थी व स्वयंसेवकांनी पर्यावरण संवर्धनाच्या संदेशाचा प्रसार करण्यासाठी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी:

- नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक विसर्जनाबाबत जागरूकता निर्माण केली.
- निर्माल्य व कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत माहिती दिली.
- जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्याबाबत जनजागृती केली.
- विसर्जनस्थळांची स्वच्छता राखण्याच्या महत्त्वावर भर दिला.
- पर्यावरण संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचा संदेश दिला.
- पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित केले.

संस्थात्मक सहकार्य

या उपक्रमामध्ये विद्या प्रसारक मंडळाचे, ठाणे विधी महाविद्यालय, DLLE, ठाणे महानगरपालिका आणि अक्षय्य स्वस्ती फाऊंडेशन यांचे सहकार्य लाभले.

शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शैक्षणिक ज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन यांचा प्रभावी समन्वय साधला गेला. या उपक्रमामुळे पुढील बाबींना चालना मिळाली:

- नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाबाबत जागरूकता निर्माण झाली.
- जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्याबाबत जनजागृती झाली.
- पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला.
- विसर्जन स्थळांवरील स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित झाले.
- विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारीची भावना दृढ झाली.
- गणेशोत्सव आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

'गणेश विसर्जन निमित्त पर्यावरण संवर्धन जनजागृती उपक्रम' हा पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला. विधी महाविद्यालय DLLE, ठाणे महानगरपालिका आणि अक्षय्य स्वस्ती फाऊंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून गणेशोत्सवाची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची किंवा कोणत्याही एका संस्थेची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

स्वच्छ पर्यावरण – जबाबदार उत्सव – शाश्वत भविष्य!



दि. २३ व २४ सप्टेंबर २०२६ – आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (DLLE) व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी संभाषण कौशल्य व व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम.

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (Department of Lifelong Learning and Extension - DLLE), मुंबई

विद्यापीठ यांच्यावतीने Skill India - National Skill Development Corporation (NSDC) यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी संभाषण कौशल्य व व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण कार्यक्रम दि. २३ व २४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्रा. डॉ. बालिराम एन. गायकवाड, संचालक, DLLE, मुंबई विद्यापीठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमामध्ये श्रीमती जयश्री पुजारा, Senior Trainer, BM Academy तसेच श्रीमती माया भाटिया, Director, BM Academy, English Trainer व Personality Development Trainer यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास, इंग्रजी संभाषण, सार्वजनिक भाषण, स्टेजवरील आत्मविश्वास, देहबोली, व्यावसायिक वेशभूषा व व्यक्तिमत्त्व सादरीकरण यासंदर्भात मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.
२. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
३. स्टेजवर किंवा मोठ्या समूहासमोर बोलताना वाटणारी भीती व संकोच दूर करणे.
४. विद्यार्थ्यांचे इंग्रजी संभाषण व संवादकौशल्य विकसित करणे.
५. विचार स्पष्ट, प्रभावी आणि आत्मविश्वासाने मांडण्याची क्षमता विकसित करणे.
६. विद्यार्थ्यांचे सार्वजनिक भाषण व सादरीकरण कौशल्य वाढविणे.
७. योग्य वेशभूषा, वैयक्तिक स्वच्छता व व्यावसायिक व्यक्तिमत्त्व याबाबत जागरूकता निर्माण करणे.
८. विद्यार्थ्यांची देहबोली व आंतरवैयक्तिक संवादकौशल्ये विकसित करणे.
९. मुलाखतीसाठी आवश्यक असलेल्या आत्मविश्वास व व्यावसायिक कौशल्यांचा विकास करणे.
१०. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन व स्व-जाणीव निर्माण करणे.
११. शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात प्रभावीपणे वावरण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे.
१२. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील व्यावसायिक जीवनासाठी अधिक सक्षम व सज्ज करणे.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक व प्रशिक्षक प्रा. डॉ. बालिराम एन. गायकवाड, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (DLLE), मुंबई विद्यापीठ संपूर्ण कार्यक्रमास प्रा. डॉ. बालिराम एन. गायकवाड, संचालक, DLLE, मुंबई विद्यापीठ यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कौशल्यांचा आणि व्यावसायिक क्षमतांचा विकास करण्याच्या दृष्टीने अशा प्रशिक्षण कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

सुश्री जयश्री पुजारा, Senior Trainer, BM Academy, सुश्री जयश्री पुजारा यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास निर्माण करणे, स्टेजवरील भीती दूर करणे, सार्वजनिक भाषण, व्यक्तिमत्त्व विकास आणि प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागासाठी प्रोत्साहित करून स्वतःचे विचार स्पष्टपणे आणि आत्मविश्वासाने मांडण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

श्रीमती माया भाटिया Director, BM Academy, English Trainer व Personality Development Trainer, यांनी इंग्रजी भाषेतील संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, प्रभावी संवाद, व्यावसायिक वर्तन आणि स्वतःचे प्रभावी सादरीकरण यावर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणामध्ये समाविष्ट प्रमुख विषय

अ) व्यक्तिमत्त्व विकास

प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास ही सातत्याने सुरू असणारी प्रक्रिया असल्याचे समजावून सांगण्यात आले. यामध्ये पुढील बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले:

- स्वतःची ओळख व स्व-जाणीव विकसित करणे.
- स्वतःच्या क्षमता व सुधारणेच्या क्षेत्रांची ओळख करून घेणे.
- सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे.
- आत्मविश्वास वाढविणे.
- इतरांशी प्रभावीपणे संवाद साधणे.
- सामाजिक व व्यावसायिक परिस्थितीत योग्य वर्तन करणे.
- प्रभावी प्रथमदर्शनी व्यक्तिमत्त्व निर्माण करणे.
- शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रासाठी आवश्यक गुण विकसित करणे.

विद्यार्थ्यांना स्पष्ट करण्यात आले की, व्यक्तिमत्त्व म्हणजे केवळ बाह्य स्वरूप नसून, त्यामध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य, दृष्टिकोन, देहबोली, वर्तन, शिष्टाचार आणि व्यावसायिक आचरण यांचाही समावेश होतो.

आत्मविश्वास वाढविणे

प्रशिक्षणातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांना पुढील बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात आले:

- बोलताना होणारा संकोच दूर करणे.
- स्वतःचे विचार आत्मविश्वासाने व्यक्त करणे.
- स्वतःबद्दलची नकारात्मक भावना कमी करणे.
- इतरांशी संवाद साधताना आत्मविश्वास ठेवणे.
- चर्चांमध्ये सक्रिय सहभाग घेणे.
- स्वतःच्या मतांची स्पष्टपणे मांडणी करणे.
- चुका झाल्यास त्यातून शिकण्याचा सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे.
- स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवणे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या Comfort Zone मधून बाहेर पडून नवीन अनुभव घेण्यास आणि संवादामध्ये सक्रिय सहभाग घेण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

स्टेजवरील आत्मविश्वास व सार्वजनिक भाषण

कार्यक्रमामध्ये Stage Courage आणि Public Speaking यांना विशेष महत्त्व देण्यात आले. विद्यार्थ्यांना पुढील बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात आले:

- प्रेक्षकांसमोर बोलण्याची भीती कशी दूर करावी.
- भाषणाची सुरुवात आत्मविश्वासाने कशी करावी.
- बोलण्यापूर्वी विचारांची योग्य मांडणी कशी करावी.
- प्रेक्षकांशी योग्य Eye Contact कसा ठेवावा.
- प्रभावी देहबोलीचा वापर कसा करावा.
- स्पष्ट आणि ऐकू येईल अशा आवाजात कसे बोलावे.
- बोलताना अनावश्यक संकोच व घाबरटपणा कसा कमी करावा.
- भाषणाची मांडणी क्रमबद्ध पद्धतीने कशी करावी.

विद्यार्थ्यांना सांगण्यात आले की, सार्वजनिक भाषणाचे कौशल्य सातत्यपूर्ण सराव, तयारी आणि प्रत्यक्ष सहभागामुळे अधिक विकसित होते.

इंग्रजी संभाषण कौशल्य

प्रशिक्षणामध्ये English Communication Skills वर विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांना पुढील बाबींचे मार्गदर्शन देण्यात आले:

- इंग्रजीमध्ये आत्मविश्वासाने बोलणे.

- दैनंदिन संभाषणामध्ये इंग्रजीचा वापर करणे.
- योग्य शब्दसंग्रह विकसित करणे.
- उच्चारामध्ये सुधारणा करणे.
- योग्य वाक्यरचना करणे.
- आपले विचार स्पष्टपणे मांडणे.
- इंग्रजी बोलताना होणारा संकोच कमी करणे.
- समोरच्या व्यक्तीचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून योग्य प्रतिसाद देणे.
- शैक्षणिक व व्यावसायिक परिस्थितीत योग्य इंग्रजीचा वापर करणे.

विद्यार्थ्यांना नियमित वाचन, ऐकणे, बोलणे आणि संभाषणाचा सराव करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

आत्मविश्वासाने इंग्रजी कसे बोलावे

इंग्रजी बोलताना अनेक विद्यार्थ्यांना चुका होण्याची भीती वाटते. या बाबीवर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पुढील सूचना देण्यात आल्या:

१. बोलण्यापूर्वी विचार स्पष्ट करावा.
२. सुरुवातीला साधी व स्पष्ट वाक्ये वापरावीत.
३. अनावश्यक संकोच टाळावा.
४. चुका होण्याच्या भीतीपेक्षा संवाद साधण्यावर भर द्यावा.
५. नियमित इंग्रजी संभाषणाचा सराव करावा.
६. समोरच्या व्यक्तीचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकावे.
७. नियमित वाचनातून शब्दसंग्रह वाढवावा.
८. दैनंदिन जीवनात इंग्रजीचा वापर करण्याचा प्रयत्न करावा.

देहबोली – Body Language

प्रभावी संवादामध्ये देहबोलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यामध्ये :

- योग्य Eye Contact ठेवणे.
- योग्य शारीरिक स्थिती व Posture ठेवणे.
- चेहऱ्यावरील योग्य भाव.
- योग्य हातवारे.
- आत्मविश्वासपूर्ण उभे राहणे व बसणे.
- बोलताना शरीराच्या हालचालींचा योग्य वापर.
- अस्वस्थता दर्शविणाऱ्या अनावश्यक हालचाली टाळणे.

यामुळे मौखिक संवादाला योग्य प्रकारे पूरक ठरणारी सकारात्मक देहबोली विकसित होण्यास मदत होते.

वेशभूषा व वैयक्तिक सुसज्जता

विद्यार्थ्यांना Professional Dress Code आणि Grooming याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये:

- शैक्षणिक व व्यावसायिक कार्यक्रमांसाठी योग्य वेशभूषा.
- मुलाखतीसाठी योग्य पोशाख.
- स्वच्छता व नीटनेटकेपणा.
- वैयक्तिक सुसज्जता.
- प्रसंगानुरूप वेशभूषा.
- व्यावसायिक वातावरणास अनुरूप व्यक्तिमत्त्व सादरीकरण.

यावर भर देण्यात आला की, व्यावसायिक व्यक्तिमत्त्वामध्ये स्वच्छता, नीटनेटकेपणा, योग्य वेशभूषा आणि प्रसंगानुरूप सादरीकरण यांना महत्त्व असते.

मुलाखत कौशल्य

विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगार व व्यावसायिक संधी लक्षात घेऊन Interview Skills बाबत मार्गदर्शन देण्यात आले. यामध्ये :

- स्वतःची ओळख आत्मविश्वासाने करून देणे.
- मुलाखतीदरम्यान योग्य देहबोली ठेवणे.
- प्रश्नांची स्पष्ट व समर्पक उत्तरे देणे.
- स्वतःच्या शैक्षणिक व व्यावसायिक गुणांची मांडणी करणे.
- मुलाखतीपूर्वी योग्य तयारी करणे.
- योग्य व्यावसायिक वेशभूषा ठेवणे.
- वेळेचे भान व वक्तशीरपणा राखणे.
- प्रश्नांना उत्तर देताना आत्मविश्वास कायम ठेवणे.

व्यावसायिक शिष्टाचार

विद्यार्थ्यांना Professional Etiquette विषयीही मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये:

- आदरयुक्त संवाद.
- औपचारिक परिस्थितीत योग्य वर्तन.
- इतरांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकणे.
- वक्तशीरपणा.
- व्यावसायिक आचार-विचार.
- वरिष्ठ, सहकारी व इतर व्यक्तींशी योग्य संवाद.
- सकारात्मक व सहकार्यपूर्ण दृष्टिकोन.

या गुणांचे व्यावसायिक जीवनात महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

भीती व संकोच दूर करणे – प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना भीती व संकोच यावर मात करण्यासाठी सराव, तयारी आणि सातत्यपूर्ण सहभाग आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना पुढील गोष्टी करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले:

- इतरांसमोर बोलणे.
- समूहचर्चेत सहभागी होणे.
- प्रश्न विचारणे.
- स्वतःचे मत व्यक्त करणे.
- सादरीकरणामध्ये सहभाग घेणे.
- इंग्रजी संभाषणाचा सराव करणे.
- मिळालेल्या मार्गदर्शनाचा स्वीकार करणे.
- स्वतःच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सातत्याने सुधारणा करणे.

प्रशिक्षणाची वैशिष्ट्ये – या प्रशिक्षण कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांना व्यावहारिक व सहभागात्मक मार्गदर्शन देण्यात आले. विद्यार्थ्यांना पुढील कौशल्यांचा परस्परसंबंध समजावून देण्यात आला:

आत्मविश्वास – प्रभावी संवाद – देहबोली – योग्य वेशभूषा – प्रभावी सादरीकरण – व्यक्तिमत्त्व विकास या दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाकडे अधिक व्यापक आणि व्यावहारिक दृष्टीने पाहण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांना झालेले फायदे व निष्पत्ती

प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुढील बाबींविषयी ज्ञान व मार्गदर्शन प्राप्त झाले:

- व्यक्तिमत्त्व विकास.
- आत्मविश्वास व स्व-जाणीव.
- स्टेजवरील आत्मविश्वास.
- सार्वजनिक भाषण.
- इंग्रजी संभाषण कौशल्य.
- व्यावसायिक संवाद.
- देहबोली.
- मुलाखत कौशल्य.
- व्यावसायिक वेशभूषा व Grooming.
- व्यावसायिक शिष्टाचार.
- सकारात्मक दृष्टिकोन.

- आंतरवैयक्तिक संवादकौशल्य.
- स्वतःचे प्रभावी सादरीकरण.

या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना अधिक आत्मविश्वासाने, स्पष्टपणे आणि व्यावसायिक पद्धतीने स्वतःचे विचार मांडण्यास प्रोत्साहन मिळाले.

विधी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे महत्त्व – हा प्रशिक्षण कार्यक्रम विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः उपयुक्त ठरला. विधी व्यवसायामध्ये केवळ कायद्याचे ज्ञान पुरेसे नसून प्रभावी संवाद, सार्वजनिक भाषण, आत्मविश्वास, तर्कशुद्ध मांडणी, योग्य देहबोली आणि व्यावसायिक व्यक्तिमत्त्व यांनाही महत्त्व असते. विधी विद्यार्थ्यांना भविष्यात Moot Court, Seminar, Presentation, Interview, Client Interaction, Legal Discussion आणि Professional Communication यांसारख्या विविध परिस्थितींना सामोरे जावे लागते. त्या दृष्टीने या प्रशिक्षणातून मिळालेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक विकासासाठी उपयुक्त ठरले.

DLLE ची भूमिका – आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (DLLE), मुंबई विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या पारंपरिक शैक्षणिक अभ्यासासोबत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवितो. प्रा. डॉ. बालिराम एन. गायकवाड, संचालक, DLLE, मुंबई विद्यापीठ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच कौशल्याधारित आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या.

एकूण निष्पत्ती – व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी संभाषण कौशल्य व व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त उपक्रम ठरला. श्रीमती जयश्री पुजारा, Senior Trainer, BM Academy आणि श्रीमती माया भाटिया, Director, BM Academy, English Trainer व Personality Development Trainer यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, इंग्रजी संभाषण, सार्वजनिक भाषण, देहबोली, व्यावसायिक वेशभूषा, Grooming आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व याविषयी व्यावहारिक मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना संकोच दूर करून आत्मविश्वासाने संवाद साधणे, प्रेक्षकांसमोर बोलणे, इंग्रजी संभाषणात सहभागी होणे आणि व्यावसायिक वातावरणात स्वतःचे प्रभावी सादरीकरण करणे यांचे महत्त्व समजले.

निष्कर्ष – विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व, संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि व्यावसायिक तयारीच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना हे जाणून घेण्याची संधी मिळाली की, व्यावसायिक यशासाठी केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून प्रभावी संवाद, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, योग्य देहबोली, व्यावसायिक वर्तन आणि स्वतःचे प्रभावी सादरीकरण यांनाही महत्त्व आहे. प्रा. डॉ. बालिराम एन. गायकवाड, संचालक, DLLE, मुंबई विद्यापीठ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वि.प्र.मं.चे, ठाणे विधी महाविद्यालय येथील DLLE टीमच्या समन्वयाने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला.



२८ सप्टेंबर रोजी मुंबई विद्यापीठाद्वारे महाविद्यालयातील परीक्षा प्रक्रियेचे लेखापरीक्षण करण्यात आले

Leaders on Campus – २९ सप्टेंबर २०२६ रोजी Leaders on Campus या उपक्रमांतर्गत Be the CEO of Your Life या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित

करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. अमित करखानीस. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या जीवनाचे नेतृत्व, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, ध्येय निश्चिती, निर्णयक्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातर्फे सहाय्यक प्राध्यापक श्री. शिवाजी बिबे, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी व उपयुक्त ठरला. विशेषतः स्वतःच्या करिअरचे व जीवनाचे नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांबाबत विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले.

सहाय्यक प्राध्यापक यश – डॉ. रुपाली श्याम जामोडे

महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. रुपाली श्याम जामोडे यांनी AI Based Device for Pattern Analysis या नावाच्या डिझाइनची वर्ग १४-०२ अंतर्गत नोंदणी प्राप्त करून उल्लेखनीय शैक्षणिक व संशोधनात्मक कामगिरी केली आहे. डिझाइन्स अधिनियम, २००० आणि डिझाइन्स नियम, २००१ यांच्या तरतुदींनुसार मिळालेली ही मान्यता नावीन्यपूर्ण संशोधन, तंत्रज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासातील महत्त्वपूर्ण योगदान असून, संपूर्ण संस्थेसाठी ही अभिमानाची बाब आहे.

महाविद्यालयाच्या चार विद्यार्थिनींची राज्य ग्राहक आयोगात इंटर्न म्हणून निवड

महाविद्यालयातील द्वितीय वर्ष एलएल.बी.च्या चार विद्यार्थिनींची महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगात (State Consumer Disputes Redressal Commission, Maharashtra) इंटर्न म्हणून निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये चिन्मयी दिंडोरकर, भाविका शिंदे, अमृता नहाटे आणि जिज्ञा कांबळे यांचा समावेश आहे. राज्य ग्राहक आयोगासारख्या महत्त्वपूर्ण न्यायिक संस्थेत प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि उपप्राचार्य डॉ. विनोद एच. वाघ यांनी चारही विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार म्हणाल्या, राज्य ग्राहक आयोगात इंटर्न म्हणून काम करण्याची संधी विद्यार्थिनींसाठी अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण आहे. या अनुभवातून त्यांना ग्राहक कायदा, न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रत्यक्ष न्यायव्यवस्थेचे कामकाज समजून घेता येईल. हा अनुभव त्यांच्या व्यावसायिक आणि शैक्षणिक भवितव्याला निश्चितच दिशा देणारा.



विद्या प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय

''बॅटल ऑफ बाइट्स अँड बोर्डस''

कार्यक्रमाचे नाव : बॅटल ऑफ बाइट्स अँड बोर्डस

आयोजक : तंत्रज्ञान क्लब

दिनांक : १० सप्टेंबर वेळ : दुपारी २:०० ते ४:००

स्थळ : एआर अँड आयएफ विभाग, व्हीपीएम कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग

प्रस्तावना – अभियंता दिन २०२६ च्या उत्सवाचा एक भाग म्हणून व्हीपीएमसीओई तंत्रज्ञान क्लबने ''बॅटल ऑफ बाइट्स अँड बोर्डस'' या तांत्रिक स्पर्धेचे आयोजन केले. हा कार्यक्रम १० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २:०० ते ४:०० या वेळेत एआर विभाग व आयएफ प्रयोगशाळेत पार पडला.

विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांना त्यांचे तांत्रिक ज्ञान, व्यावहारिक कौशल्ये, तार्किक विचारशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सांघिक कार्य दाखवण्याची संधी देण्यासाठी हा कार्यक्रम आखण्यात आला होता. स्पर्धेची संकल्पना होती:

'शोध घ्या, नवोन्मेष करा, प्रेरित करा'


यामध्ये कोअर इंजिनीअरिंग तसेच आयटी/सीएस पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी खास तयार केलेली तांत्रिक आव्हाने होती, त्यानंतर अंतिम फेरीत रॅपिड क्विझ स्पर्धा घेण्यात आली.

कार्यक्रमाची रचना – सहभागी विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीनुसार स्पर्धा वेगवेगळ्या तांत्रिक उपक्रमांमध्ये विभागण्यात आली होती.

अ. बोर्डुस – कोअर इंजिनीअरिंग विद्यार्थ्यांसाठी (6 9/66/2**)**

बोर्डुस आव्हानात सहभागींना जागेवरच एक सर्किट आकृती देण्यात आली. त्यांना पुढील गोष्टी करणे आवश्यक होते:

- दिलेली सर्किट आकृती समजून घेणे.
- आवश्यक घटक ओळखणे.
- सर्किट प्रत्यक्षात तयार करणे.
- निर्धारित वेळेत अंमलबजावणी पूर्ण करणे.
- तयार केलेले सर्किट कार्यरत असल्याचे दाखवणे.



जागेवर दिलेला सर्किट आकृती विद्यार्थी ब्रेडबोर्डवर सर्किट तयार करताना

या फेरीत सहभागींची सर्किट समजून घेण्याची क्षमता, व्यावहारिक इलेक्ट्रॉनिक्स कौशल्य, अचूकता आणि दडपणाखाली काम करण्याची क्षमता तपासली गेली.

ब. बाइट्स – (CO/IT) पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी – बाइट्स आव्हान प्रोग्रामिंग आणि डीबगिंगवर केंद्रित होते.

सहभागींना पुढीलपैकी एक देण्यात आहे : अनपेक्षित प्रोग्रामिंग टास्क, किंवा डीबगिंग आव्हान हे दिलेल्या वेळेत पूर्ण करावयाचे होते. या फेरीत पुढील गोष्टींचे मूल्यमापन करण्यात आहे:

- प्रोग्रामिंग कौशल्य
- तार्किक विचारशक्ती
- डीबगिंग क्षमता
- प्रोग्रामिंग संकल्पनांची समज
- वेग आणि अचूकता
- सहभागींनी मर्यादित वेळेत समस्यांचे विश्लेषण करून योग्य प्रोग्रामिंग उपाय तयार करण्याची क्षमता दाखवली.

सहभाग आणि प्रतिसाद

विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि क्विझ-आधारित आव्हानांच्या संयोजनामुळे वेगवेगळ्या तांत्रिक आवडी असलेल्या विद्यार्थ्यासाठी ही स्पर्धा आकर्षक ठरली.

सहभागींनी संपूर्ण कार्यक्रमात सर्जनशीलता, तांत्रिक ज्ञान, समस्या सोडवण्याचे कौशल्य, स्पर्धात्मक वृत्ती आणि सांघिक कार्य दाखवले.

वेळेच्या बंधनामुळे आव्हानांना अधिक उत्साह मिळाला आणि विद्यार्थ्यांना जलद व परिणामकारक विचार करण्यास प्रोत्साहन मिळाले.

अंतिम फेरी – रॅपिड क्विझ स्पर्धा

वरील तांत्रिक उपक्रमांतील विजेते अंतिम फेरी – – रॅपिड क्विझ स्पर्धेसाठी पात्र ठरले.

या क्विझमध्ये सहभागींचे सर्वसाधारण अभियांत्रिकी ज्ञान, तांत्रिक संकलपना, तार्किक विचारशक्ती आणि तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रांबाबतची जाणीव तपासण्यात आली.

रॅपिड-फायर स्वरूपामुळे अंतिम फेरी रोमांचक आणि स्पर्धात्मक बनली, तसेच सहभागींची जलद विचारशक्ती आणि निर्णयक्षमताही तपासली गेली.

या अंतिम फेरीतील कामगिरीच्या आधारे अंतिम विजेता ठरवण्यात आला.

विजेते – स्पर्धेचा समारोप विजेत्यांच्या घोषणेने झाला.

प्रथम : अ) प्रथमेश हजारे ब) अर्णव वाणी

द्वितीय : अ त्रिशा शेट्टी ब) आरती सिंग

उत्तेजनार्थ पारितोषिक: अ) रुद्र राखसे ब) श्रेयस हिंदुराव

विजेत्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, तांत्रिक ज्ञानाबद्दल आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेबद्दल अभिनंदन करण्यात आले.



विजेत्यांना पारितोषिक वितरण

निष्कर्ष – ''बॅटल ऑफ बाइट्स अँड बोर्डस'' हा कार्यक्रम व्हीपीएमसीओई तंत्रज्ञान क्लबने अभियंता दिन २०२६ च्या उत्सवाचा भाग म्हणून यशस्वीरीत्या पार पाडला.

या कार्यक्रमात हार्डवेअर व सॉफ्टवेअर आव्हाने एकत्र आणली गेली, त्यानंतर रोमांचक रॅपिड क्विझ घेण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे विविध अभियांत्रिकी कौशल्य दाखवण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले.

या कार्यक्रमाचे यश हे विभागप्रमुख, प्राध्यापक समन्वयक, विद्यार्थी समन्वयक, स्वयंसेवक, सहभागी आणि तंत्रज्ञान क्लबच्या सदस्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. या कार्यक्रमाने खऱ्या अर्थाने पुढील भावना प्रतिबिंबित केली:

''शोध घ्या ⁎ नवोन्मेष करा ⁎ प्रेरित करा''

ही केवळ एक स्पर्धा नव्हती तर विद्यार्थ्यांना एकमेकांकडून शिकण्याची, स्वतःच्या क्षमता तपासण्याची आणि अभियांत्रिकीचे वैशिष्ट्य असलेल्या सर्जनशीलता व समस्या सोडवण्याच्या वृत्तीचा उत्सव साजरा करण्याची संधी होती.

महाविद्यालयात अभियांत्रिकी दिन उत्साहात साजरा

महाविद्यालयात ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे दिनांक १५ सप्टेंबर रोजी अभियांत्रिकी दिन दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत ग्रंथालयातील वाचन कक्ष येथे साजरा करण्यात आला. सदर दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दि . कृ. नायक यांचे शुभहस्ते भारतरत्न सर एम. विस्वेस्वरय्या यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रसंगी डॉ. गीताली इंगवले, प्रा. स्मिता खंडागळे, ग्रंथालय सहाय्यक श्री. चंद्रकांत शिंगाडे, सौ. मानली आजीवले आणि विद्यार्थी हजार होते.

देशाच्या प्रगतीमध्ये आणि पायाभूत सुविधांच्या विकासात अभियंत्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. आधुनिक भारताचे शिल्पकार सिव्हिल इंजिनीअर भारतरत्न सर एम. विस्वेस्वरय्या यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षी अभियांत्रिकी दिन साजरा करण्यात येतो. सदर कार्यक्रमाचा मुख्य उदेश असा आहे की, विद्यार्थ्यामध्ये तांत्रिक कौशल्ये, नव-संशोधन आणि राष्ट्र उभारणीची भावना जागृत करणे हा होय.

भारतात दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस अभियांत्रिकी दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताचे थोर सुपुत्र महान अभियंता आणि भारतरत्न सर मोक्षगुंडम विस्वेस्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त त्याच्या स्मृतीस व राष्ट्रनिर्माणातील योगदानास अभिवादन करण्यासाठी समर्पित आहे.




पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ २०२६

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ हा महाराष्ट्र शासनाने राज्यभरातील युवक आणि महिलांना थेट नोकरी, कौशल्य आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केलेला एक राज्यव्यापी रोजगार महामेळावा उपक्रम आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २९ सप्टेंबर, २०२६ रोजी मुंबईतील चर्चगेट येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये झाले.

महाविद्यालयाने रोजगार मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. महाकुंभ २०२६ मध्ये विद्यार्थी प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये भाग घेतला, आपली उपस्थिती नोंदवली आणि कार्यक्रमादरम्यान केलेले भाषण व मौल्यवान विचार ऐकून घेतले.

रोजगारचा भाग म्हणून महाकुंभ उपक्रमांतर्गत, अनेक नामांकित कंपन्यांनी इंटर्नशिप मुलाखती घेण्यासाठी कॉलेज कॅम्पसला भेट दिली. कॉलेजच्या पाचही शाखांमधील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मुलाखत प्रक्रियेत भाग घेतला आणि उद्योग प्रतिनिधींशी संवाद साधण्याची व इंटर्नशिपच्या संधी शोधण्याची ही मौल्यवान संधी साधली.

सहभागी कंपन्यांचा तपशील आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाचा तपशील खाली दिला आहे –

१ सॅमकॉन इंडस्ट्रियल कंट्रोल प्रायव्हेट लि.– ५०
२ प्रगती इलेक्ट्रिकल्स प्रायव्हेट लि., ठाणे– ३७
३ बेस्ट, मुंबई – ३५
४ द्रोणा एव्हिएशन – १०
५ पीएनटी अकादमी – १४
६ रूट इंजिनीअरिंग अकादमी – १९
७ सीमेन्स – १०
८ परिपूर्ण इन्स्ट्रुमेंटेशन नियंत्रणे – १०
९ अक्युनिटी एलएलपी – १३
१० इवोक – ०५
११ ग्लोबल एलिव्हेटर्स प्रायव्हेट लिमिटेड – ५५
१२ आयस्पेस सोलर एलएलपी – ६९
१३ क्लाउडिओप्स – ०१
१४ आशिदा इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लि. – ९६
१५ ईएआरजीएस लर्निंग सोल्युशन्स प्राय.लि.– ११०
१६ आयमार्टिकस लर्निंग – ७०

कार्यक्रमाचे प्रमुख परिणाम–

- इंडस्ट्री इंटर्नशिप आणि मुलाखत प्रक्रियेचा थेट अनुभव मिळाला.
- विद्यार्थ्यांनी उद्योग प्रतिनिधींशी संवाद साधला आणि उद्योगाच्या अपेक्षांविषयी माहिती मिळवली.
- उपलब्ध इंटर्नशिप आणि करिअरच्या संधींबद्दल अधिक माहिती मिळाली.
- मुलाखतीच्या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या संवाद, तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्यांचे मूल्यांकन करण्यास व त्यात सुधारणा करण्यास मदत झाली.

- या कार्यक्रमाने उद्योग-संस्था संवाद अधिक दृढ केला आणि विद्यार्थ्यांना संभाव्य नोकरीदात्यांशी संपर्क साधण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.
- मुलाखतीच्या कार्यपद्धती, भरतीसाठीच्या आवश्यकता आणि कामाच्या ठिकाणच्या अपेक्षा यांचे व्यावहारिक ज्ञान मिळाले.

  भविष्यातील रोजगार आणि करिअरच्या संधींसाठी स्वतःला तयार करण्यास प्रोत्साहित केले.

एकंदरीत, या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राचा अर्थपूर्ण अनुभव दिला आणि त्यांचा आत्मविश्वास, व्यावसायिक जाणीव व भविष्यातील करिअरच्या संधींसाठीची सज्जता वाढवण्यास मदत केली. विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग आणि उद्योग प्रतिनिधींच्या सक्रिय सहभागाने हा कार्यक्रम यशस्वी व प्रभावी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

२ सप्टेंबर २०२६ : श्री. संजय सपकाळ यांनी 'फ्रीडम व्हर्च्युअल चॅलेंज रन – ५६ किमी' ही शर्यत अवघ्या ७ दिवसांत यशस्वीरीत्या पूर्ण केली.

६ सप्टेंबर २०२६ : सातारा हिल मॅरेथॉन या भारताच्या एका अत्यंत प्रसिद्ध आणि खडतर हाफ मॅरेथॉन स्पर्धेत ब्रिम्स परिवारातील धावपटुंनी उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धेमधील विक्रमी सहभागाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स तर्फे अधिकृतपणे नोंद झाली.

डॉ. नीतिन जोशी यांनी २१ किमी हाफ मॅरेथॉन २:०८:५७ वेळेत पूर्ण केली.

श्री. संजय सपकाळ यांनी २१ किमी हाफ मॅरेथॉन ३:२६:५७ वेळेत पूर्ण केली.

श्री. स्वप्निल पवार यांनी २१ किमी हाफ मॅरेथॉन ३:२०:०० वेळेत पूर्ण केली.



०६ सप्टेंबर २०२६ : एमएमएस २०२६-२८ तुकडीचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री. सोहम पाटील याने ऑल स्पोर्ट्स कराटे – डीओ फाऊंडेशनतर्फे आयोजित कराटे – पहिल्या राष्ट्रीय 'ऑल मार्शल आर्ट / योग चॅम्पियनशिप २०२६' या स्पर्धेमध्ये मध्ये ५० किलो वजनी गटात प्रथम स्थान पटकावले.



१५ सप्टेंबर २०२६ : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग येथे आयोजित 'मानव-एआय सहकार्य' या संकल्पनेवर आधारित 'लीड २०२७' परिषदेच्या पेपर डेव्हलपमेंट वर्कशॉप (PDW) मध्ये सहाय्यक प्रा. अदिती यांनी एक शोधनिबंध सादर केला.

१८ सप्टेंबर २०२६ : सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर, डॉ. कांचन अक्षय आणि डॉ. श्रीपाद बापट यांनी 'मानव संसाधन व्यवस्थापनातील एआय' (AI in Human Resource Management) या विषयावर एक पुस्तक प्रकाशित केले.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❊ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
❊ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
❊ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
अशा सुविधांनी युक्त

सभागृहाचे नाव	ठिकाण	आसन क्षमता
थोरले बाजीराव पेशवे सभागृह	महाविद्यालय परिसर	३००
कात्यायन सभागृह	कला/वाणिज्य इमारत	१६०
पातंजली सभागृह	बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत	१६०
पाणिनी सभागृह	डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत	१८०
मनु सभागृह	वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत	२५०

❊ **संपर्क** ❊

कार्यवाह

विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०
Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.